





दैनिक

रुबाबदार राज्याचा, जबाबदार विचार...

# लक्ष महाराष्ट्र

www.lakshamaharashtra.com lakshamaha.dhule@gmail.com lakshamaha.nsk@gmail.com ▶ RNI No.MAHMAR/2019/79184

▶ धुळे-नंदुरबार-नाशिक आवृत्ती ▶ वर्ष ५ वे ▶ अंक : ७० वा ▶ रविवार दि.१४ जानेवारी २०२४ ▶ किंमत :२ रु. ▶ पृष्ठे : ४



खुशखबर... खुशखबर...

खास लोकांच्या आग्रहास्तव

पार्सल सेवा व रिटर्न बुकींग उपलब्ध

न्यू विजेयंत ट्रॅव्हल्स, धुळे



धुळे ते नागपुर, अमरावती, अकोला

स्लिपर कोच २X१ नॉन एसी बस

रात्री १०.३० वाजेला

संपर्क:- Mo.7035436897, (02562) 236897, 237896

द.नं.१४, प्रबोधनकार ठाकरे संकुल,धुळे


## न्यूज कॉलम

### किरकोळ मारहाणीत दोघे जखमी

**धुळे ।** दहिवेल येथे किरकोळ कारणावरुन झालेल्या वादाचे पर्यावसाण मोठ्या हाणामारीत झाले असून त्यात महिलेसह दोघे जखमी झाले. कुऱ्हाडीच्या लाकडी दांड्याने मारहाण केल्याने अमर जहागिरे बहिरम, सुनंदाबाई शांताराम बागुल (दोन्ही रा. बाभुळदे, ता.साक्री) जखमी झाले. याप्रकरणी अमर बहिरम यांनी दिलेल्या फिर्यादीवरून संशयित युवराज नानाजी पवार, अभिमन नानाजी पवार व अन्य एकाविरूद्ध साक्री पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला. पोलिस तपास करीत आहेत

### मोटारसायकलस्वार अपघातात एक ठार

**धुळे ।** निमगुळ शिवारात भरधाव कारने दिलेल्या धडकेत मोटारसायकलस्वार ठार झाला. दोन जानेवारीस दुपारी साडेचारच्या सुमारास निमगुळ गावाजवळ कारने (एमएच१८/बीसी२५०७) मोटारसायकलला (एमएच१८/एचएस २५१४) जोरदार धडक दिली. अपघातात मोटारसायकलर मागे बसलेला महेश पंडीत पोतदार (२६, रा.निमगुळ) खाली पडल्याने त्याच्या डोक्याला गंभीर दुखापत होऊन त्याचा मृत्यू झाला. याप्रकरणी हर्षल बागल (रा. पुणे) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार दोंडाईचा पोलीस ठाण्यात कारचालक प्रविण हरेसिंग गिरासे (रा. मांजरे, जि.नंदुरबार) याच्याविरूध्द अपघाताचा गुन्हा दाखल झाला.

# पंतप्रधानपदासाठी आम्हाला कुठल्याही चेहऱ्याची गरज नाही : शरद पवार

### आम्हाला बहुमत मिळाल्यावर पर्याय देऊ

**पुणे । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

आम्हाला एखाद्याच्या चेहरा प्रोजेक्ट करून त्याच्या नावाने मतं मागावी असं आत्ता तरी अजिबात वाटत नाही, कारण आम्हाला खात्री आहे की, आगामी लोकसभा निवडणूक झाल्यावर आणि आम्हाला बहुमत मिळाल्यावर आम्ही निश्चितच देशाला चांगला पर्याय देऊ, असे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सर्वेसर्वा शरद पवार यांनी आज स्पष्ट केले.

जुन्नर येथे झालेल्या पत्रकारपरिषदेत ते बोलत होते. इंडिया आघाडीचा पंतप्रधान पदाचा चेहरा कोण, या प्रश्नावर पवारांनी भाष्य केले. तर पंतप्रधानपदाच्या चेहऱ्यावरून चर्चेत असलेले काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्या नावाला त्यांनी अप्रत्यक्षपणे विरोध केला आहे.

केंद्रातल्या मोदी सरकारविरोधात काँग्रेससह देशभरातील २५ हून अधिक विरोधी पक्ष इंडिया (आघाडी) या एका छताखाली एकत्र आले आहेत. त्यामुळे आगामी लोकसभा निवडणुकीत भाजपाप्रणित एनडीएविरुद्ध इंडिया आघाडी असा सामना होणार आहे. आगामी लोकसभा निवडणुकीत पंतप्रधानपदासाठी दलित चेहरा घेऊन भाजपाला आव्हान देण्याची इंडिया आघाडीकडून तयारी सुरू असल्याचे बोलले जात आहे. इंडिया आघाडीची गेल्या महिन्यात दिल्लीत एक बैठक पार पडली. या बैठकीत इंडिया आघाडीतल्या तृणमूल काँग्रेस पक्षाच्या प्रमुख आणि पश्र्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी पंतप्रधानपदासाठी मल्लिकार्जुन खरगे यांच्या नावाचा प्रस्ताव ठेवला होता. त्यास आम आदमी पार्टी, शिवसेना (ठाकरे गट), द्रविड मुन्नेत्र कळघमसह अनेक पक्षांनी पाठिंबा दर्शवला होता. परंतु, शरद पवारांसारख्या वरिष्ठ नेत्यांनी त्यास पाठिंबा दर्शवलेला नाही.

शरद पवार म्हणाले १९७७ च्या निवडणुका झाल्या तेव्हा आम्ही पंतप्रधानपदाचा चेहरा आधीच घोषित केला नव्हता. निवडणुका झाल्या, त्या निवडणुकीत ज्या पक्षाची लोकांनी निवड केली त्या पक्षाने मोरारजी देसाई यांची पंतप्रधानपदी नियुक्ती केली. निवडणुकीला सामोरे जाताना कोणाचीही निवड केली नव्हती. तरीदेखील तेव्हा आम्ही निवडणूक जिंकलो. कारण तेव्हा लोकांमध्ये आणीबाणीविरोधात तीव्र भावना होत्या. त्या लक्षात घेऊन आम्ही मतं मागितली आणि लोकांनी मतं दिली. परिणामी आम्हाला कोणालाही प्रोजेक्ट करावं लागलं नाही. तशीच परिस्थिती आत्तादेखील आहे. आम्हाला कोणालाही प्रोजेक्ट करण्याची आवश्यकता नाही.



### विरोधकांचा चेहरा कोण?

**आगामी निवडणुकीतही विद्यमान पंतप्रधान नरेंद्र मोदी हेच भाजपाचा पंतप्रधानपदाचा चेहरा असतील. भाजपासह एनडीएतील सर्वच पक्ष नरेंद्र मोदी यांच्या नावावर मतं मागताना दिसतील. परंतु, विरोधकांच्या इंडिया आघाडीचा पंतप्रधानपदाचा चेहरा कोण असेल हे अद्याप ठरलेलं नाही. काही दिवसांपूर्वी काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्या नावाची चर्चा चालू होती. परंतु, त्यास राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रमुख शरद पवार, जनता दल युनायटेडचे प्रमुख आणि बिहारचे मुख्यमंत्री नितिश कुमार यांच्यासह इंडिया आघाडीतल्या काही पक्षांचा विरोध असल्याचे दिसून आले.**

# २२ जानेवारीला सगळ्यांनी घरांमध्ये श्री राम ज्योती प्रज्वलित करा

### पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आवाहन

**मुंबई । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काही वेळापूर्वी व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे जुनागडमधील (गुजरात) 'आई श्री सोनल माँ' यांच्या जन्मशताब्दी समारंभाला संबोधित केलं. यावेळी पंतप्रधान म्हणाले, सोनल माँ यांचं जीवन पाहिलं तर सर्वांच्या लक्षात येईल की, असं कुठलंही यूग नाही ज्या युगात या भारतभूमीवर महान आत्मे अवतरले नसतील. गुजरात आणि सौराष्ट्रची भूमी ही महान संतांची भूमी आहे. सौराष्ट्रच्या मोठ्या संत परंपरेतील श्री सोनल माँ या आधुनिक युगासाठी दीपस्तंभ होत्या. त्यांची अध्यात्मिक ऊर्जा, मानवतावादी उपदेश, तपश्चर्या आणि शिकवण कायमच आपल्या लक्षात राहील.

पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले, सोनल माँ यांच्या व्यक्तिमत्वात एक अद्भूत दैवी गूण होता, ज्याचं लोकांना खूप आकर्षण होतं. आजही तुम्ही जुनागडमधील सोनलधामला भेट दिली तर तुम्हाला ती दैवी शक्ती अनुभवता येईल. सोनल माँ यांनी शिक्षणाच्या क्षेत्रातही मोलाची कामगिरी बजावली होती. तसेच त्यांनी समाजाचं प्रबोधनही केलं. लोकांना व्यसनापासून मुक्त केलं. व्यसनांच्या अंधारातून समाजाला



बाहेर काढण्यासाठी आणि त्याच समाजात नवा प्रकाश निर्माण करण्यासाठी सोनल माँ यांनी मोलाचं योगदान दिलं.

नरेंद्र मोदी म्हणाले, सोनल माँ यांनी समाजातला अंधकार नष्ट करण्याचं काम केलं. देशाची एकता आणि अखंडतेसाठी प्रयत्न केले. देशातील एकात्मतेसाठी त्या भक्कम भींत बनून उभ्या राहिल्या. भारताची फाळणी झाली तेव्हा जुनागड तोडण्याचं षडयंत्र काहींनी रचलं होतं. तसेच जुनागड भारतापासून हिरावण्याचे प्रयत्नही चालू होते. परंतु, या सर्वांविरोधात श्री सोनल माँ चंडीप्रमाणे उभ्या राहिल्या. आता २२ जानेवारी रोजी अयोध्येतील श्री राम मंदिरात प्राणप्रतिष्ठा केली जाणार आहे. ते पाहून सोनल माँ खूप आनंदी होतील. त्यामुळे मी तुम्हा सर्वांना आवाहन करतो की, येत्या २२ जानेवारी रोजी सायंकाळी तुमच्या घरांमध्ये श्री राम ज्योती प्रज्वलित करा. कालपासून आपण देशभरातील मंदिरांमध्ये स्वच्छता अभियान सुरू केलं आहे.

# कर व दर वाढीचे प्रस्ताव महापालिका प्रशासकांच्या कार्यकाळात लागणार

**मुंबई । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

नागरिकांचा रोष टाळण्यासाठी आजवरच्या सत्ताधाऱ्यांनी थांबवलेले कर व दर वाढीचे प्रस्ताव महापालिका प्रशासकांच्या कार्यकाळात मार्गी लागण्याची शक्यता आहे. मालमत्ता कर, पाणीपट्टीसह इतर कर, विविध विभागांकडून विविध परवानग्या, कामांसाठी आकारले जाणारे दर वाढवण्याबाबत विभाग प्रमुखांकडून प्रस्ताव मागवण्यात आले आहेत. येत्या तीन दिवसात हे प्रस्ताव सादर करावेत, असे आदेश प्रशासकातर्फे काढण्यात आले.

गेल्या १८ वर्षांपासून महापालिकेच्या मालमत्ता करात वाढ झालेली नाही. पाणीपट्टीमध्ये वाढ करण्याचे प्रस्ताव पाणी प्रश्र्नाचे कारण देऊन सातत्याने फेटाळण्यात आले आहेत. शासन आदेशानुसार अग्निशमन कराची अंमलबजावणीही गेल्या चार वर्षांपासून रखडलेली आहे. विविध कारणांमुळे महापालिकेचे उत्पन्नाचे स्रोत आटले आहेत. खर्च मात्र दिवसेंदिवस वाढत असल्याने महापालिकेच्या आर्थिक अडचणी वाढल्या आहेत. प्रशासक राजमुळे स्थायी समिती व सर्वसाधारण सभेचे अधिकार आयुक्तांकडे आहेत. परीणामी कर व दर वाढीच्या रखडलेल्या प्रस्तावांना गती मिळण्याची शक्यता आहे. आयुक्त जावळे यांनी याबाबत सर्व विभाग प्रमुखांना आढावा घेऊन प्रस्ताव सादर करण्याचे आदेश दिले आहेत. विशेष म्हणजे, प्रस्तावांना विलंब झाल्यास शिस्तभंग कारवाई करण्याचा इशाराही आयुक्तांनी दिला आहे.

# पोलिस प्रशासनातर्फे जिल्ह्यात झाडाझडती

### धुळे जिल्ह्यात हॉटेल, लॉज, गेस्ट हाऊसची तपासणी

**धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

पोलिस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांच्या सूचनेनुसार जिल्ह्यात विविध ठिकाणी दोन दिवस तपासणी अभियान राबविण्यात आले. जिल्हाभरात २२ ठिकाणी नाकाबंदी करण्यात येऊन ७४४ वाहनांची तपासणी झाली. त्यात ३३ वाहनचालकांवर दंडात्मक कारवाई झाली, ४० हॉटेल्स, लॉजेस व गेस्ट हाऊस आणि १७ हिस्ट्रीशीटर तपासले गेले. २२ अधिकारी आणि ८९ अंमलदारांतर्फे ही मोहीम राबविली गेली.

शहरात साक्री रोडवर, गिंदोडिया चौक, वीर सावरकर पुतळा, वलवाडी टी पॉईंट, लोकमान्य हॉस्पिटलनजीक, लळिंग टोलनाका, संतोषी माता चौक (शहर वाहतूक शाखा), दसेरा मैदान (जिल्हा वाचक शाखा), नेर फाटा, शिरूड चौफुली (ता. धुळे), साक्री पोलिस स्टेशनसमोर, खुडाणे चौफुली (निजामपूर), सामोडे चौफुली, सटाणा टी पॉईंट (पिंपळनेर), सोनगीर फाटा (ता. धुळे), करवंद नाका (शिरपूर शहर), बेटावद चौफुली (नरडाणा), नंदुरबार चौफुली (दोंडाईचा), पाटण व चिमठाणा चौफुली (शिंदखेडा), भाटपुरा चौकी (थाळनेर ता. शिरपूर), हाडाखेड सीमा तपासणी नाका (ता. शिरपूर) आदी ठिकाणी रात्री व दिवसभरात नाकाबंदी करुन वाहनांची तपासणी करण्यात आली.

सर्वाधिक ७० वाहनांची तपासणी मोहाडी पोलिस ठाण्याच्या हद्दीत झाली, गिंदोडिया चौकात ६५ वाहने तपासली गेली. यादरम्यान जिल्हाभरात दोंडाईचा (ता. शिंदखेडा) पोलिस ठाण्याच्या हद्दीत सर्वाधिक १३ हॉटेल, लॉजेस व गेस्ट हाऊसची तपासणी करण्यात आली. पिंपळनेर (ता.साक्री) पाच, आझादनगर व साक्री पोलिस ठाण्याच्या अखत्यारित प्रतेकी चार ठिकाणी तपासणी झाली. अधीक्षक धिवरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपअधीक्षक ऋषीकेश रेड्डी, उपविभागीय पोलिस अधिकारी सचिन हिरे, पश्चिम देवपूरच्या सहाय्यक निरीक्षक संगीता राऊत यांच्यासह शिरपूर तालुका पोलिस ठाणे, पिंपळनेर पोलिस ठाणे, निजामपूर, शिंदखेडा पोलिस ठाण्याच्या अधिकाऱ्यांनी कारवाई केली.

### अक्कडसे येथे वाळू ठेकेदार, मजुरांना केली मारहाण

**धुळे ।** अक्कडसे (ता. शिंदखेडा) येथे ग्रामस्थांनी गावाच्या नदी पात्रात सुरू असलेले वाळु उत्खननाचे काम रोखत ठेकेदारासह मजुरांना शिवीगाळ व दमबाजी केली. काल सकाळी हा प्रकार घडला. याप्रकरणी आठ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला. ठेकेदार गोविंदा बडे (वय ५० रा. माहतपुरी ता. गंगाखेडा जि. परभणी व ह.मु अक्कडसे) याने शिंदखेडा पोलिसात दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, अक्कडसेतील आनंदा कोळी, विक्की कोळी, राजेश कोळी, दादु कोळी, मच्छिंद्र कोळी, सागर कोळी, गटल्या कोळी, मुकेश कोळी यांनी हातात लाठ्या-काठ्या घेवून वाळु ठिय्यावर येवून आरडा-ओरड केली. वाळु वाहतुक कसे काय करीत आहेत, अशी विचारणा करीत शिवीगाळ, दमदाटी करीत मारहाण केली.

# महायुतीचा आज धुळ्यात जिल्हास्तरीय महामेळावा समन्वयकांची पत्रकार परिषदेत माहिती

**धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

लोकसभेच्या आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्ष- शिवसेना (शिंदे गट), राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) तसेच अन्य १५ घटक पक्षांच्या महायुतीचा रविवार दिनांक १४ जानेवारी रोजी सकाळी अकरा वाजता धुळे शहरातील पांझरा नदीकाठावरील अग्रवाल विश्राम भवनात पालकमंत्री ना. गिरीश महाजन यांच्या प्रमुख उपस्थितीत महामेळावा आयोजित करण्यात आला आहे. आगामी लोकसभा निवडणुकीत राज्यातील लोकसभेच्या ४८ पैकी ४५ हून अधिक जागांवर महायुतीचे खासदार निवडून आणत नरेंद्र मोदी यांना तिसऱ्यांदा पंतप्रधानपदी विराजमान करण्याचा संकल्प महायुतीतर्फे करण्यात आला आहे.

या संकल्प सिद्धीसाठी हा मेळावा होत असल्याची माहिती खासदार डॉ. सुभाष भामरे, भाजपा धुळे शहर विधानसभा क्षेत्रप्रमुख अनुप अग्रवाल,



महानगरप्रमुख गजेंद्र अंपळकर व मेळावा समन्वयकांयनी दिनांक १३ जानेवारी रोजी पत्रकार परिषदेत दिली. साक्रीच्या आमदार मंजुळा गावित, माजी आमदार राजवर्धन कदमबांडे, भाजपचे ग्रामीण जिल्हाध्यक्ष बबन चौधरी, महायुतीचे भाजपचे समन्वयक अनुप अग्रवाल, शिवसेनेचे समन्वयक प्रसाद ढोमसे, राष्ट्रवादी काँग्रेसचे समन्वयक किरण शिंदे, आरपीआयचे आठवले गटाचे ड. महेंद्र निळे, राष्ट्रवादी काँग्रेसचे सुरेश सोनवणे, शिवसेना शिंदे गटाचे जिल्हाप्रमुख सतीश महाले, मनोज मोरे, भाजपचे महानगर जिल्हाध्यक्ष गजेंद्र अंपळकर, भाजप महिला मोर्चाच्या उत्तर महाराष्ट्र प्रमुख जयश्री अहिरराव, संजय गुजराथी, आरपीआयचे शशिकांत वाघ, नगरसेविका भारती माळी, किरण सिंघवी, प्रा. अरविंद जाधव, राम भदाणे, यशवंत येवलेकर, संदीप बैसाणे, चेतन मंडोरे, संजय वाल्हे, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे कैलास चौधरी आदी उपस्थित होते. खासदार डॉ. भामरे म्हणाले की, भाजपाचा संकल्प तडीस नेण्यासाठी महायुतीत समाविष्ट सर्वच पक्षांच्या जिल्हास्तरीय पदाधिकारी, नेते, कार्यकर्ते व बूथस्तरीय पदाधिकाऱ्यांचा महामेळावा संपूर्ण राज्यात उद्या १४ जानेवारीला एकाच दिवशी व एकाच वेळी होत आहे. या महामेळाव्यात आपापसांतील सर्व मतभेद बाजूला ठेवत एकदिलाने महायुतीच्या वरिष्ठ नेत्यांनी केलेला संकल्प पूर्ण करण्याचा निश्चय करण्यात आला आहे. त्यानुसार हा महामेळावा होत आहे

# पुर्ववैमनस्यातून मोहाडी येथील एकावर पिस्तुल रोखून दमदाटी

**धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

शहरातील चाळीसगांव रस्त्यावरील व्यायामशाळेजवळ झालेले भांडण सोडवण्याचा प्रयत्न करणाऱ्यावर पिस्तुल रोखून ठार मारण्याची धमकी दिली, याप्रकरणी तीघांविरुध्द मोहाडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला.

चाळीसगांव रोडवरील मारोती नगरमध्ये बुधवारी (ता.१०) भांडण झाली होती. भांडण जतीन उर्फ अजय श्रीधर आव्हाळे (रा. जयशंकर कॉलनी) याने सोडवण्याचा प्रयत्न केला. यामुळे संशयित रोहित थोरात, परशुराम परदेशी व अन्य एका रिक्षा चालकाने मोहाडी येथील तिखी रस्त्यावरील हनुमान मंदिराजवळ गुरूवारी (ता.११) रात्री नऊला यांच्याशी वाद घातला. आणि मला ओळखत नाही का, तुला माहित आहे ना माझ्यावर किती गुन्हे दाखल आहेत. मी जेलमध्ये जायला घाबरत नाही. तु या रिकाम्या भानगडीत पडू नको, असे म्हणत शिवीगाळ केली. तसेच यावेळी परशुराम परदेशी याने त्याच्या जवळील पिस्तुल काढून बटणावर बोट ठेवला व जतीन आव्हाळे याच्या कमरेवर पिस्तुल रोखून ठार मारण्याची धमकी दिली. या फिर्यादीवरुन तिघांविरुध्द मोहाडी पोलिस ठाण्यात खुनाचा प्रयत्न केल्याच्या आरोपाखाली गुन्हा दाखल झाला आहे.

### टेकवाडे येथे महिलेचा विनयभंग

**शिरपूर ।** टेकवाडे (ता. शिरपूर) येथे पंचायतीच्या महिला कर्मचाऱ्याचा विनयभंग केल्याप्रकरणी चौकशीअंत शिरपुर शहर पोलिस ठाण्यात विनयभंगाचा गुन्हा दाखल झाला. पीडित महिलेने दिलेल्या फिर्यादीनुसार २९ डिसेंबरला सकाळी आठच्या सुमारास संजय शिवराम धनगर, शिला संजय धनगर (रा.टेकवाडे) यांनी पुरेसे पाणी मिळाले नाही, म्हणून वाद घातला. घरात घुसून मारहाण केली, लज्जा वाटेल असे कृत्य करून महिलेचा विनयभंग केला. तसेच घरातील मुलांना मारहाण करीत घराच्या भींतीचेही नुकसान केले, संशयित शिला धनगर हिने शिवीगाळ करीत ठार मारण्याची धमकी दिली.

# नैसर्गिक आपत्तीबाबत शाळेत आपत्तीव्यवस्थापनाचे प्रशिक्षण देणे आवश्यक

### जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांचे प्रतिपादन

**धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

नैसर्गिक आपत्तीबाबत विद्यार्थीदशेतच विद्यार्थ्यांना माहिती मिळावी, यासाठी शाळेतच प्रात्याक्षिकांसह आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशिक्षण देणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी केले.

महाराष्ट्र राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या निर्देशानुसार जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, धुळे, राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आज सावळदे



(ता.शिरपूर) येथे पूर व्यवस्थापन या विषयी रंगीत तालीम व स्कुबा डायव्हींगचे प्रशिक्षण झाले. त्यावेळी श्री.गोयल बोलत होते. उपविभागीय अधिकारी प्रमोद भामरे, तहसिलदार महेंद्र माळी, पोलीस उपअधिक्षक सचिन हिरे, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. दत्ता देगांवकर, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी जितेंद्र सोनवणे, मुख्याधिकारी श्री.नेरकर, राज्य आपत्ती प्रतिसाद दलाचे सहायक समादेशक चंद्रकांत पारसकर, राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाचे पोलीस निरीक्षक योगेशकुमार शर्मा, सहायक रितेश कुमार, सरपंच अनिल महाजन, कृषि उत्पन्न बाजार समितीचे संचालक विठोबा महाजन, उपसरपंच सचिन राजपूत, आदी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी अभिनव गोयल म्हणाले की, अचानक उद्भवलेल्या नैसर्गिक आपत्ती उद्भवल्यास विविध समस्यांना तोंड द्यावे लागते. त्यामुळे अशा परिस्थितीमुळे मोठी हानी होण्याची शक्यताही नाकारता येत नाही. या संकटांना तोंड देण्यासाठी प्रत्येक शाळामधुन मुलांना आपत्तीव्यवस्थापनाचे प्रशिक्षण देणे गरजेचे आहे. त्याच बरोबरच पालकांनीही आपल्या मुलांना भूकंप, पूर, वीज पडल्यावर काय करायला पाहिजे यागोष्टी सांगितल्या पाहिजे. त्यामुळे आपत्तीकालीन परिस्थितीत आपण स्वत:चा तसेच इतर लोकांचे जीव वाचवू शकतो. युटयूब तसेच संकेतस्थळावर आपत्तीकाळात काय करावे काय करु नये याबाबत भरपूर माहिती मिळते या माहितीच्या आधारे मुलांना व आपल्या गावातील नागरिकांना माहिती दिल्यास या माहितीचा निश्र्चित उपयोग होईल. जिल्हा प्रशासनामार्फत गतीमान प्रशासन अभियानंतर्गत लाईफ जॅकेट, स्टेचर व इतर आवश्यक साहित्य खरेदी करुन देण्यात येत आहे. तसेच राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाने आपत्तीसाठी लागणाऱ्या साहित्याची यादी तयार करुन दिल्यास गतीमान प्रशासन अभियानातंर्गत किंवा जिल्हा वार्षिक योजनेतून साहित्य खरेदी केले जाईल.

# पिंपळेतांडा येथे शेतमजुरावर चाकूने हल्ला

**शिरपूर । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

पिंपळेतांडा (ता.शिरपूर) शिवारातील शेतातील झाड तोडल्याने केळीच्या झाडांचे नुकसान झाले. याचा जाब विचारणाऱ्या शेत मजुरावर एकाने चाकुने हल्ला केला. सुनिल भगवान पाटील (रा.मोहिदा, ता.चोपडा) असे शेत मजुराचे नाव आहे. त्याने दिलेल्या फिर्यादीनुसार गाव शिवारातील शेतात किशोर मगन पाटील याने शेतातील निंबाचे झाडाच्या फांद्या तोडल्याने केळीच्या झाडांचे नुकसान झाले, त्यास विचारणा केली असता त्याने शिवीगाळ करीत मारहाण केली. तसेच खिशातील चाकुने वार केला. यात सुनीलच्या डाव्या

हाताला चाकु लागल्याने गंभीर जखम झाली. यावेळी आरडाओरड झाल्याने मगन लखा पाटील, यमुबाई मगन पाटील, प्रतिभा किशोर पाटील (सर्व रा.भावेर) आले. त्यांनीही शिवीगाळ करीत मारहाण केली, ठार मारण्याची धमकीही दिली. याप्रकरणी थाळनेर पोलीस ठाण्यात वरील चौघा संशयितांवर गुन्हा दाखल झाला.

## उभे आडवे पुणे

वाढत्या शहरीकरणामुळे होणारे संभाव्य दुष्परिणाम कमी करण्यासाठी प्रादेशिक समानता, मध्यम व छोट्या शहरांचा विकास यांवर भर देण्याची गरज आहे. केवळ उंच मनोरे बांधून वाढत्या लोकसंख्येचा प्रश्न सुटणार नाही, हेही लक्षात घ्यावे लागेल.

वाढती लोकसंख्या, वाढते शहरीकरण, जमिनीचा अभाव यामुळे विविध शहरांत गगनचुंबी इमारतींची आवश्यकता भासू लागली आहे. जगातील मोठ्या शहरात आढळणार्या गगनचुंबी इमारती आता देशातल्या महानगरामध्ये उभ्या राहात आहेत. मुंबईप्रमाणेच पुणे शहराच्या उपनगरातही शंभर मीटरपेक्षा अधिक उंचीच्या इमारती बांधण्यास महापालिकेने मान्यता दिली आहे. बोपोडीमध्ये १६० मीटर म्हणजे चाळीस मजली इमारतीला महापालिकेने मंजुरी दिली आहे. बाणेर, बालेवाडी, खराडी, वडगाव शेरी आदी भागांत सर्वाधिक उंचीच्या इमारतींना याआधीच परवानगी देण्यात आली आहे. पुण्याची लोकसंख्या वाढत असताना वाढत्या लोकसंख्येला सामावून घेण्यासाठी अशा गगनचुंबी इमारतींची गरज नाकारता येणार नाही, हे खरेच; पण वाढत्या शहरीकरणामुळे निर्माण होणार्या समस्यांचे निराकरण करणे हे स्थानिक प्रशासनासमोरचे मोठे आव्हान आहे. औद्योगिकीकरण, रोजगाराची उपलब्धता यामुळे पुण्याकडे येणार्यांचा वाढता ओघ यामुळे पुणे शहर उभे आडवे वाढत आहे. राज्य सरकारने घेतलेल्या हद्दवाढीच्या निर्णयामुळे मूळचे पुणे आता विस्तारत चालले आहे. १९९७ मध्ये महापालिकेच्या हद्दीत २३ गावे आली. त्यानंतर २०२१ पर्यंत आणखी ३५ गावांचा समावेश झाला. वाढत्या लोकसंख्येच्या प्रमाणात घरांची उपलब्धता निर्माण व्हावी यासाठी बांधकाम व्यावसायिकांनी अनेक प्रकल्प हाती घेतले. माहिती तंत्रज्ञान क्षेत्रामुळे हिंजवडी, खराडी, वडगाव शेरी यांसारख्या भागात सदनिकांची गरज भासू लागली. पुरेशा प्रमाणात जागा उपलब्ध नसल्याने बहुमजली इमारतींना प्राधान्य मिळू लागले. रस्ता रुंदी आणि भूखंडाचे क्षेत्रफळ याचा विचार करून राज्य सरकारने ७० मीटरपेक्षा अधिक उंचीच्या इमारतींना सशर्त परवानगी देण्याचा निर्णय घेतल्यानंतर गगनचुंबी इमारतींबाबत हा निर्णय घेतला आहे. आतापर्यंतच्या सर्वाधिक म्हणजे १६० मीटर उंचीच्या इमारतींना परवानगी देण्यात आली.

गगनचुंबी इमारतीमधील घरे परवडणारा समाजातील घटक हा ज्यांचे आर्थिक उत्पन्न भरपूर आहे, असाच असणार, विशेषतः आयटीमध्ये लाखो रूपयांचे पॅकेज असणार्या वर्गासाठीच ही घरे परवडणारी ठरतील. यातून आर्थिक विषमतेस खतपाणी मिळणार आहे. यामुळे शहराच्या लोकसंख्येत अधिकच भर पडणार आणि त्यातून नव्या समस्या उभ्या राहणार आहेत. शहरी भागात लोकसंख्येची घनता जशी वाढली तशी इमारतीचा विस्तार होण्याऐवजी त्या वाढवण्याची गरज भासू लागली. उद्योग, व्यापार, व्यवसाय यांमुळेही व्यावसायिक जागेची गरज यातून बहुमजली इमारतींना प्रोत्साहन मिळत गेले. पाच मजली इमारतीपासून हजार फुटांच्या टॉवरपर्यंत गगनचुंबी इमारती जगात आहेत. लिफ्टचा शोध लागल्यानंतर आणि जागेच्या किमती वाढू लागण्याचा परिणाम बांधकाम व्यवसायावर होऊ लागल्यामुळे कमीत कमी जागेचा जास्तीत जास्त वापर करून घेण्याच्या कल्पनेतून गगनचुंबी इमारती अस्तित्वात आल्या. वाढत्या लोकसंख्येला सामावून घेण्यासाठी बहुमजली इमारतीची गरज मान्य केली तरी वाढत्या शहरीकरणामुळे शहरातील सोयी सुविधांवर ताण येतोच. वाढत्या लोकसंख्येला आवश्यक असलेल्या पाणीपुरवठा, सार्वजनिक वाहतुकीच्या सुविधा, मल निस्सारण यांसारखे प्रश्न उभे राहतात. ज्यांना अशी घरे परवडत नाहीत ते झोपड्यांचाच आश्रय घेतात, यातून सामाजिक विषमतेलाच खतपाणी मिळते. गरिबांसाठी, मध्यमवर्गीयांसाठी परवडणारी घरे बांधण्यावर भर, छोट्या आणि मध्यम आकाराच्या खेड्यांमध्ये विविध सोयी सुविधा आणि रोजगाराची उपलब्धता होऊ शकेल अशा उद्योगांची, व्यवसायाची उभारणी झाली तरच शहराकडे येणारी गर्दी रोखली जाईल. शहरालगतच्या खेड्यांचा सुनियोजित विकास झाला तर शहराकडे येणारा ओघ कमी होऊ शकेल. देशाच्या विकासासाठी गावांच्या शहरीकरणाची गरज लक्षात घ्यावी लागेल.

# होरायझन अकॅडमीत जागतिक दर्जाच्या ICT प्रकल्पाची सुरुवात

मविप्र च्या होरायझन अकादमी (ICSE), नाशिक आणि योकोहामा, जपान स्थित लोईलो (LoiLo Inc.), एज्युकेशन टेक्नॉलॉजी कंपनी या दोहोंत सामंजस्य करारा द्वारे ,पायोनियर फ्यूचर-रेडी एज्युकेशन : ब्रिजिंग ग्लोबल ट्रेंड्स इन 21st सेंच्युरी लर्निंग उपक्रमाची सुरुवात झाली आहे .आयसीटी तंत्र शैक्षणिक पद्धती प्रगत करण्याच्या दिशेने एक महत्त्वाची वाटचाल सुरू करण्यासाठी मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या होरायझन अकॅडमी, नाशिक या स्कूलने जपान स्थित लोइलो इन्कॉर्पोरेटेड (LoiLo Inc.) (एक अग्रगण्य एज्युकेशन टेक्नोलॉजी कंपनी योकोहामा, जपान ) सोबत आपली भागीदारी अभिमानाने घोषित केली आहे. लोईलोनोट ( LoiLo Note School ) हा उपक्रम केवळ एक महत्त्वाची झेपच दर्शवत नाही तर तो अत्याधुनिक आयसीटी (ICT) अंगीकारण्याचा जो जागतिक ट्रेंड आहे त्याच्याशी सुसंगत आहे.

विकसित देशांमध्ये, आयसीटी तंत्र आधुनिक शिक्षणाचा आधारस्तंभ बनलेले आहे, ते विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशीलता, प्रतिबद्धता आणि भविष्यासाठी प्रगत कौशल्ये वाढवतात. एक आयटी राष्ट्र म्हणून भारताची ओळख अत्यावश्यक आहे.हे ओळखून, बालपणापासूनच या जागतिक पद्धतींशी जुळवून घेण्यासाठी मविप्र संस्थेच्या होरायझन अकॅडमीने लॉइलोनोट(LoiLoNote) सोबत केलेला हा सामंजस्य करार २१ व्या शतकातील आव्हाने पेलण्यासाठी आणि आयटी क्षेत्रातील विविध संधींसाठी तरुणांना तयार करण्यासाठी एक स्तुत्य उपक्रम आहे.

लॉइलोनोट (LoiLoNote), जपानच्या अग्रगण्य एज्युकेशन टेक्नॉलॉजी कंपनी, लोईलो (LoiLo Inc.) चे उत्पादन आहे. ज्याने जपानी शिक्षण व्यवस्थेत विशेषतः उजतखऊ-१९ साथीच्या रोगामुळे उद्भवलेल्या आव्हानांच्या वेळी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. तंत्रज्ञानाच्या नाविन्यपूर्ण वापराने जपानच्या शिक्षणामध्ये केवळ सातत्य राखले नाही तर त्यांच्या प्रणालीची लवचिकता आणि अनुकूलता देखील प्रदर्शित केली. आता, २००७ पासून एका मिशनसह,लोईलो (LoiLo Inc.) ने जगभरातील १२,००० हून अधिक शाळांचे आयसीटी शाळांमध्ये यशस्वीपणे रूपांतर केलेले आहे, ज्याचा दररोज २.४ दशलक्ष विद्यार्थी आणि शिक्षकांना फायदा होत आहे.

लॉइलोनोट (LoiLoNote) हे फक्त एक साधन नाही तर विद्यार्थी-केंद्रित शिक्षणासाठी डिझाईन केलेले एक सर्वसमावेशक डिजिटल प्लॅटफॉर्म आहे. लॉइलोनोट(LoiLoNote) डिजी टल शिक्षण प्रवासातील धड्याच्या निर्मितीपासून ते परस्परसंवादी सत्रे, अभिप्राय, गृहपाठ, चाचण्या आणि उपस्थिती हे प्रत्येक पैलू कव्हर करते. वैयक्तिक मूल्यमापन आणि विचारसाधने जे विद्यार्थ्यांना विचार निर्मिती करण्यास आणि नवीन कल्पनांना उत्तेजन देण्यासाठी प्रोत्साहित करतात, तसेच शिक्षणाकडे पाहण्याचा सर्वांगीण दृष्टीकोन सुनिश्चित करतात.

विद्यार्थ्यांची उत्तरे पाहणे आणि त्यांची तुलना करण्याच्या क्षमतेसह शिक्षक पूर्ण नियंत्रण मिळवतात.वैयक्तिक अभिप्राय प्रदान करतात आणि परस्परसंवाद वाढवतात, शेवटी विद्यार्थ्यांची तार्किक आणि दृश्य विचार कौशल्ये वाढवतात. याचा परिणाम म्हणजे विद्यार्थ्यांच्या शिक्षणातील स्वारस्य आणि प्रेरणा यामध्ये लक्षणीय वाढ होते आणि एक आकर्षक आणि गतिमान शिक्षणविषयक वातावरण तयार होते.



शब्द संवाद
प्राचार्य प्रशांत पाटील
(नाशिक) मो.९५११८५९९३९

मविप्र च्या होरायझन अकादमी आणि लॉइलोनोट(LoiLoNote) यांच्यातील सहकार्य हे तंत्रज्ञानाच्या अवलंबापलीकडचे आहे; हे भारत आणि जपान यांच्यातील ज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या गहन देवाणघेवाणीचे प्रतीक आहे. जपानच्या नावीन्यपूर्ण गिगा (GIGA) कार्यक्रमातून प्रेरणा घेऊन, होरायझन अकादमीची लॉइलोनोटबरोबर (LoiLoNote) सह भागीदारी सकारात्मक मार्गाचे आश्वासन देते. विद्यार्थ्यांचे शिकण्याचा अनुभव वाढवण्यावर आणि त्यांना भविष्यासाठी तयार करण्यावर विशेष लक्ष केंद्रित करते.

जागतिक लँडस्केप विकसित होत असल्याचे आपण पाहत असताना, शैक्षणिक संस्थांसाठी शाश्वत आणि लवचिक क्षमता निर्माण करणे महत्त्वाचे आहे. होरायझन अकादमी च्या शैक्षणिक आराखड्यात लॉइलोनोट (LoiLoNote) चा समावेश भविष्यासाठी विद्यार्थ्यांना तयार करणाऱ्या अग्रेषित विचारसरणीचे प्रतिबिंब आहे. (ज्यामध्ये तांत्रिक (प्रवीणता) प्रावीण्य आणि परिपूर्ण अनुकूलन क्षमता आहे )

हा उपक्रम होरायझन अकादमी द्वारा जागतिक दर्जाचे शिक्षण देण्याच्या वचनबद्धतेचा पुरावा आहे. जो केवळ जागतिक सर्वोत्तम पद्धतींचा स्वीकार करत नाही तर प्रत्येक विद्यार्थ्याची प्रतिभाशक्ती आणि क्षमता देखील वाढवतो. होरायझन अकादमी पालकांना, शिक्षकांना आणि समाजाला नाविन्यपूर्ण आणि सहयोगी शिक्षणाद्वारे उज्ज्वल भविष्य घडवण्यासाठी कटिबध्द आहे.

कंपनीने शाळेला ५५ ॲपलचे ळझरव सहित सॉफ्टवेअर विद्यार्थी व शिक्षकांसाठी पूर्णपणे मोफत उपब्धत करून दिले आहेत. तसेच तांत्रिक सपोर्ट साठी पूर्णवेळ आपल्या खर्चाने मनुष्यबळ उपलब्ध करून दिले आहे. होरायझन अकॅडमी त खउढ शिकक्षणासाठी विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाच्या सुविधा निर्माण झाल्या आहेत. या प्रकल्प संपूर्ण भारतासाठी येणाऱ्या काळात पथदर्शी ठरेल यात शंका नाही.

# ...तरी महिलांनी लगेच घटस्फोट घेऊ नये!

झपाट्याने बदलत चाललेली कुटुंब व्यवस्था, बिघडलेली सामाजिक रचना, विभक्त होण्याकडे वाढलेला कल, महिलांमध्ये असणाऱ्या व्यक्ती स्वातंत्र्याच्या फालतू कल्पना, जोडीदाराकडून केल्या जाणाऱ्या आवाजावी अपेक्षा, संपुष्टात येत चाललेली साधी समाधानी प्रवृत्ती आणि आपण कामावते आहोत, सुशिक्षित आहोत याची धुंदी, त्यामुळे वाढत चाललेले पती-पत्नीमधील घटस्फोट आजमितीला सगळ्यांसाठी मोठं आव्हान आहे. अनेक आणि कल्पनेपलीकडील कारणे या वाढत्या घटस्फोटामागे असतात.


छोट्या-छोट्या किरकोळ वाद-विवादामुळे, घरोघरी होणाऱ्या कलहामुळे, पती-पत्नींमधील समजूतदारपणा आणि संवादाचा अभाव माहेरील लोकांचा प्रमाणापेक्षा जास्त हस्तक्षेप यामुळे फक्त पुरुषच नाही, तर महिलासुद्धा मोठ्या प्रमाणात घटस्फोट घेण्याला प्राधान्य देताना दिसतात. या लेखात आपण पतीचे विवाहबाह्य संबंध आहेत, त्यांच बाहेर अफेअर आहे, त्याने बाई ठेवली आहे, त्याने एखाद्या बाईला घरात आणून ठेवलं आहे, तो एखाद्या महिलेकडे राहायला गेला आहे, तो बायकांवर पैसे उडवित आहे, तो सतत लफडी करतोय, म्हणून फारकत घेऊन वेगळे होणे ही भूमिका अनेक महिलांची असते.

घटस्फोट घेतल्यावर पुढे काय? मुलं असल्यास त्यांचं काय? आपलं भवितव्य काय? आपल्या आई-वडिलांना काय वाटेल, माहेरील कुटुंबात यांचे काय पडसाद उमटतील? सासरचे कितपत आपल्या नवऱ्याच्या अशा वागणुकीला जबाबदार आहेत? त्याच्या अनैतिक संबंधास सासरचे पाठिंबा देत आहे का? त्याला पाठीशी घालत आहेत का? यावर विचार करणे आवश्यक आहे. सासरच्या लोकांचा अजिबात दोष नसेल, तर नाहक त्यांना आपण घटस्फोट घेतल्यास किती मनस्ताप होईल हा दूरचा सखोल विचार अनेक महिला करताना दिसत नाहीत. आपल्या पतीचे विवाहबाह्य संबंध आहेत म्हणून त्याला सोडून द्यायचे, वेगळे व्हायचे, त्याच्यापासून कायमचे लांब जायचे या निर्णयातून नेमक काय साध्य होणार आहे, याचा सर्वांगीण विचार होणे आवश्यक आहे. आपल्या नवऱ्याने चुकीचं पाऊल उचललं, तो भरकटला, त्याने प्रतरणा केली, धोका दिला, आपला विश्वासघात केला, आपल्या भावनांशी तो खेळला म्हणून तो आपल्या मनातून उतरला हे शंभर टक्के खरे आहे. कोणतीही स्त्री आपला नवरा कोणासोबत वाटून घेऊ शकत नाही. नवरा जेव्हा परस्त्रीशी संबंध ठेवतो तेव्हा पत्नीचा आत्मसन्मान, मान, तीच स्थान सगळंच डळमळीत होत, हे त्रिकालाबाधित सत्य आहे. नवरा त्याच्या अशा चुकीच्या वागणुकीमुळे आपल्याला मनस्ताप देतोय, आपली मानसिकता बिघडते आहे, आपली भावनिक पिळवणूक होते आहे, सहनशीलता संपली आहे, हे बरोबर आहे. मात्र पतीचे विवाहबाह्य संबंध आहेत म्हणून त्याच्यापासून कायदेशीर मार्गाने विभक्त होण्याआधी बायकोने काही गोष्टींवर सखोल विचार करणे अपेक्षित आहे. सर्वप्रथम तर आपण स्वतः कुठे कमी पडलो आहोत का? ज्यामुळे आपल्या नवऱ्याला दुसऱ्या स्त्रीबद्दल आकर्षण वाटते आहे? आपल्यातील, आपल्या स्वभावातील वागण्या-बोलण्यातील अशा कोणत्या गोष्टी, सवयी अथवा अवगुण आहेत किंवा आपण त्याचा संसार करायला कुठे कमी पडलो आहोत, त्याच्या कोणत्या अपेक्षा आपण पूर्ण करू शकलेलो नाही, यावर आत्मपरीक्षण जरूर करावे. आपल्या बाजूने आपल्याला कोणत्याही स्वरूपाची चूक जाणवत असेल, तर ती उणीव भरून काढण्याचा पुरेपूर प्रामाणिक प्रयत्न करावा. आपल्या बाजूने सर्वतोपरी प्रयत्न करून सुद्धा जर नवऱ्याला दुसऱ्याच स्त्रीमध्ये स्वारस्य वाटतं असेल, तरीही तातडीने फारकत घेण्याचा निर्णय न घेता त्याला स्वतःला बदलण्याची संधी आणि वेळ जरूर द्यावा. एकत्र राहून ते करणे शक्य होत नसेल, खूप मानसिक तणाव येत असेल, तर काही कालावधीसाठी लांब राहून पण आपण परिस्थिती बदलण्याची वाट पाहू शकतो. आपल्या सासरचे नातेवाईक, नवऱ्याची मित्रमंडळी जर पूर्णपणे तुमच्या बाजूने असतील, तर परिस्थिती बदलणे खूप सोपं आहे. त्यामुळे धीर धरणे, थोडी वाट पाहणे, संयम ठेवणे गरजेचे आहे. नवऱ्याच्या आयुष्यात आलेली दुसरी स्त्री कोणत्या हेतूने त्याच्या जवळ आली आहे, हे समजून घेणे सर्वात महत्त्वाचे आहे. जेव्हा कोणतीही महिला एखाद्या विवाहित पुरुषासोबत संबंध ठेवते, मूल-बाळ असलेल्या माणसाशी प्रेमप्रकरण करते तेव्हा हे लक्षात घ्यावे की चूक फक्त आपल्या नवऱ्याची नाही, तर समोरील स्त्रीने तिचे वैयक्तिक हेतू, स्वार्थ, फायदा यासाठी देखील त्याला प्रेमाच्या, शारीरिक सुखाच्या जाळ्यात ओढलेले असू शकते. सर्वसामान्यपणे विवाहित पुरुषाच्या आयुष्यात आलेल्या बहुतांश स्त्रिया या स्वतः घटस्फोटित, पतीचे निधन झालेल्या, अविवाहित अथवा स्वतःच्या पतीपासून विभक्त असलेल्या असतात, असे जाणवते. त्यामुळे आपण पण याच स्त्रियांच्या समूहात स्वतःला नेवून ठेवायचे की आपला संसार सावरण्यासाठी अशा स्त्रियांकडे दुर्लक्ष करायचे, ते आपण ठरवायचे असते. आपल्या नवऱ्याच्या आयुष्यात आलेली कोणतीही परकी महिला कधीही कायमस्वरूपी त्याच्या आयुष्यात राहणारी नसते, कारण त्यांचे संबंध फक्त एकमेकांच्या गरजा भागवण्यासाठी निर्माण झालेले असतात. शारीरिक आकर्षण तसेच एकमेकांचा वापर करणे हा अशा नात्यांचा केंद्रबिंदू असतो. आपण बायको म्हणून जे कर्तव्य अथवा जबाबदारी पार पाडू शकतो आणि जे कायदेशीर अधिकार पत्नीला असतात, ते कोणत्याही परक्या स्त्रीला नसतात. त्यामुळे आपले वैयक्तिक, कौटुंबिक, सामाजिक, कायदेशीर सर्व हक्क आबाधित ठेवणे आपल्याच हातात असते. नवऱ्याच्या आयुष्यातील दुसरी स्त्री फक्त त्याची प्रेयसी असते, तिचे आपल्या घरातील इतर कोणाशीच काही लागेबांधे नसतात, तर बायको ही सासरच्या कोणाची तरी सून, कोणाची तरी मामी, काकी, भावजय, जाऊ, वाहिनी अशा अनेक नात्यांत गुंतलेली असते. नवऱ्याचे अफेअर आहे म्हणून घटस्फोटचा निर्णय घेण्याआधी नवऱ्याच्या, त्याच्या घराच्या इतर जमेच्या बाजू पण लक्षात घेणे आवश्यक आहे. इतर काही बाबतीत जर आपला नवरा योग्य असेल, परिपूर्ण असेल, सर्व जबाबदाऱ्या आणि कर्तव्य प्रामाणिकपणे पार पाडणारा असेल, कर्तृत्ववान असेल, त्याचे आर्थिक व्यवहार, नोकरी, व्यवसाय इत्यादींमध्ये तो यशस्वी असेल, आपल्याला व आपल्या मुलांना आर्थिक स्थिरता देणारा, सुरक्षा देणारा असेल, निर्व्यसनी असेल, पत्नी म्हणून आपला आदर करणारा, आपल्यावर प्रेम करणारा, आपल्याला सुख-दुःखात साथ देणारा, आपली काळजी घेणारा असेल, तर केवळ तो दुसऱ्या कोणत्या स्त्रीमध्ये काही कालावधीसाठी गुंतला किंवा त्याच्याकडून असे संबंध ठेवण्याची चूक झाली म्हणून त्याला कायमच दूर लोटणं अयोग्य आहे. त्यामुळे नवरा कोणामध्ये गुंतला म्हणून तो गुंता सोडवायला घटस्फोट हाच एक पर्याय नाही. लग्नाच्या गाठी स्वर्गात बांधल्या जातात, असे आपण म्हणतो, त्यामुळे नवऱ्याला सांभाळून घेणे, सावरणे, त्याला माफ करणे, झालं गेलं विसरून परत संसाराला लागणे, नक्कीच शक्य आहे.

कायदा, पोलीस प्रशासन नक्कीच तुमच्या पाठिशी आहेत, तुम्हाला न्याय मिळवून देण्यासाठी आहेत. आपले कोणतेच प्रयत्न यशस्वी होत नसतील, नवऱ्याकडून कोणताही सकारात्मक बदल त्याच्या वागणुकीत केला जात नसेल, तर मग गांभीर्याने विचार करून कायद्याचा आधार नक्कीच घ्या. अनेक महिला पतीच्या विवाहबाह्य संबंध आणि त्यातून होणारा मानसिक आघात, मनस्ताप याला कंटाळून आजही आत्महत्या करताना दिसतात. नवऱ्याच्या सासरच्या त्रासाला कंटाळून फक्त स्वतःचे जीवन न संपविता आपल्या मुलाबाळांना घेऊन अनेक महिला मृत्यूला कवटाळतात. इतकी टोकाची भूमिका पण महिलांनी अजिबात घेऊ नये. आपल्या बाजूने शक्य ते सर्व प्रयत्न करून पण परिस्थिती सुधरत नसेल, तर अशा भावनाशून्य व्यक्तीसाठी आपले आयुष्य संपविण्यात काहीच अर्थ नाही.

**- मीनाक्षी जगदाळे**

## शब्दकोडे-२९२



**आडवे शब्द**

१. दडपण, वजन ३. आकाशाला भेदणारा आवाज इत्यादी ८. गंध १०. भ्रम १२. बर्फाचा पर्वत १४. गरजू १६. रानात जाणारा रस्ता १८. वाकबगार, निपुण २०. साप २१. गाढव २२. जिवंत २४. घरातील मोठी माणसे २६. मोठी बहीण २७. शेंगेवरील आवरण, फोलपट २९. खुंटी, मेख ३०. पंख ३२. उत्तराधिकारी ३३. जन्म-मृत्यू ३५. फोडातील द्रव ३७. मधली बहीण ३८. रुचीहीन, बेचव ४०. उथळ मोठी वाटी ४१. राजवाडा ४२. प्रत्युत्तर ४३. इक्षुदंड, यापासून साखर बनवितात ४४. शूर ४५. खण पण कापड नव्हे ४६. श्रेष्ठ पुरुष ४९. कजाग स्त्री, आदिमाया ५१. सोन्याचे शिवकालीन नाणे ५३. हात ५५. तिरळा, काणा ५६अ. सत्त्व ५७. प्रताप, विक्रम ५९. प्रेत ६१. कलावंत ६३. मोठी जाड सतरंजी ६४. झाड ६५. चटकन रागावणारा ६६. काळ्या पाठीचे हरिण ६९. मुंबईतील एक उपनगर ७२. व्यवस्था, उद्योग ७३. समानता ७४. पेन-पन्सिलीची पेटी ७७. परिस्थिती ७८. झाडाची त्वचा ७९. पुरणाची आमटी, कोल्हापुरी मिसळीतील रस्सा ८०. पाटलाचे काम

**उभे शब्द**


२. पूर्ण बहिरा ३. चुकीचे (हिंदी) ४. क्षमा, दुर्लक्ष ५. चीर, फट ६. नवऱ्याचा भाऊ ७. मित्र, सोबती ९. एकूणात प्रमाण १०. किंमत ११. पाचवीला पुजली जाणारी १३. कापड विणण्याचे साधन १५. पशू १७. आकाश १९. मूळ आधार २१. कृष्णसखी २२. मिठाई तयार करणारा २३. तपासणी करणारा २५. बारीकसारीक २६. तारणारा २८. काढलेली सुट्टी ३०. अत्युच्च लष्करी बहुमान ३१. पांढरे केस लपवणारा ३४. अभिनेता ३६. खुंट, आंचळ ३७. संमोहित करणारे सौंदर्य ३९. मदतनीस ४७. मोजकेपणा, मितता ४८. सरस्वतीच्या जवळील वाद्य ४९. भ्रमर, भुंगा ५०. माणुसकी ५२. नकला करणारा ५४. धपाटा ५६. न्यूनता ५६ब. प्रभात ५८. सज्जनगडचे संत ६०. मऊ पदार्थाचा आघात ६२. दही घुसळण्याचे साधन ६६. फळावरील साल ६८. रायगडावरील एक कडा ७०. धमकी ७१. पवित्र, शुद्ध ७४. मनाचा ओढा ७५. घट्ट, धन ७६. शिल्लक राहिलेली रक्कम

### शब्दकोडे-२९१ चे उत्तर

**आडवे उत्तर** - १.समाचार घेणे ५.अज ७.पावसाळा १०.धड ११.चर १२.हितोपदेश १३.सम १४.मैना १५.सामना १६.जनगणना १८.कात्री १९.भू २०.तमासगीर २३.खास २५.जमा २७.ततपप २९.नावडतीचे मीठ अळणी ३३.रसा ३५.तन ३६.ळण ३८.राजवट ३९.नादावणे ४१.परवा ४३.अमर ४५.रन ४६.नकुल सहदेव ४९.मध ५०.जन्म ५१.रास ५३.वडा ५४.वळ ५५.हारजीत ५७.काजवा ५८.श्रावण ५९.वपन ६१.लव ६५.टरकणे ६७.हारा ६९.साखर ७१.कळक ७३.माळ ७४.जनगणमन ७६.समई ७८.पापा ७९.रसरशीत ८२.समरस ८३.मदन ८४.परीक्षा

**उभे उत्तर** -१.सधन २.माड ३.रचना ४.घेर ५.अतोनात ६.जप ७.पाश ८.सामान ९.सामनावीर १२.हिम १३.सण १४.मैत्री १६.जरतर १७.गडप १८.कासव २१.मावळण २२.गीत २३.खानावळ २४.युती २५.जमीनदार २६.माठ २८.पसारा ३०.डमडम ३१.चेतना ३२.अळणे ३४.नवरदेव ३७.बारकुडा ४०.वनराज ४१.पनवती ४२.वाल ४३.अधर ४४.रजतपट ४७.सजावट ४८.वळणदार ४९.महान ५२.सवाल ५६.जीव ६०.नरमाई ६२.वर्तन ६३.वहाण ६४.घळ ६६.कळ ६८.रामरक्षा ७०.खलाशी ७१.कळस ७२.कसर ७४.जपान ७५.नस

## बलराज दत्त उर्फ सुनील दत्त



हिंदी चित्रपट अभिनेते/फिल्मफेयर पुरस्कार विजेते आणि भारतीय राजकारणी.,८ वी लोकसभा सदस्य ९ वी लोकसभा सदस्य १० वी लोकसभा सदस्य १३ वी लोकसभा सदस्य १४ वी लोकसभा सदस्य. मुंबईचे नगरपाल होते. चित्रपट निर्माता दिग्दर्शक.

सुनील दत्त यांचा १९३० जन्म झाला होता आणि २५ मे २००५ मृत्यु




सुनील दत्त यांनी १९५५ मध्ये हिंदी चित्रपट रेल्वे प्लॅटफॉर्म पासून चित्रपट क्षेत्रात पदार्पण केले होते.

एक ही रास्ता,मदर इंडिया,साधना, इंसान जाग उठा,सुजाता,मुझे जिने दो,असे अनेक यशस्वी चित्रपटामध्ये काम केले.

१९६८ मध्ये त्यांना भारत सरकारने पद्मश्रीने सम्मानित केले होते.१९८४ मध्ये ते काँग्रेस पक्षात सामील झाले आणि मुंबई उत्तर पश्चिम मतदारसंघातून पाच वेळा भारताच्या संसदेत निवडून आले. पंतप्रधान मनमोहन सिंग सरकार मध्ये २००४-२००५ युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्री झाले होते तसेच मुंबईचे माजी शेरीफ देखील होते.मदर इंडिया चित्रपटाच्या निर्मिती दरम्यान सेटवर आग लागली होती. नर्गिसला वाचवण्यासाठी आगीत कुदून नर्गिसला वाचवले होते, आणि नर्गिसचे प्रेम जिंकले होते.१९५८ मध्ये त्यांनी नर्गिसशी लग्न केले. संजय दत्त मुलगा प्रिया दत्त नम्रता दत्त मुलगी त्यांची मुलं.१९८१ मध्ये नर्गिस चे कर्करोगाने निधन झाले,त्यानंतर नर्गिस दत्त फाउंडेशनची स्थापना केली होती.१९६४ मध्ये यादें चित्रपटात दिसणारे ते एकमेव अभिनेते होते कि कथनात्मक चित्रपटातील बुक ऑफ रेकॉर्ड मध्ये नोंद करण्यात आली होती.१९९३ राजकारणाकडे वळण्यासाठी चित्रपट क्षेत्रातून निवृत्ती घेतली होती.२५ मे २००५ रोजी आपल्याला जीवनाशी सुद्धा निवृत्ती घेतली.अश्या हरहुन्नरी हस्तीला सलाम.

हे मराठी दैनिक मालक **विजय आत्माराम ठाकरे** यांनी मुद्रक-प्रकाशक-संपादक- चंद्रशेखर आत्माराम पाटील यांच्या पार्वती प्रिंटर्स-२, ई ११५/३, एम.आय.डी.सी., अवधान, धुळे (एम-५) येथे छापून, लक्ष महाराष्ट्र कार्यालय, बॉम्बे लॉज बिल्डींग, पहिला मजला, आग्रारोड धुळे येथून प्रकाशित केले.
**'लक्ष महाराष्ट्र' नाशिक कार्यालय** - फ्लॅट नं.१०, गंगा अपार्टमेंट, बोहरा पार्क, गंगापूर रोड, नाशिक-४२२००२ **मध्यवर्ती कार्यालय-** बॉम्बे लॉज बिल्डींग, दौलत म्युझिक सेंटरच्यावरती, पहिला मजला, आग्रारोड, धुळे. मो.९६६४३२५५५५ फोन नं. ०२५६२-३५६५७४.
**नंदुरबार कार्यालय** - शॉप नं. ११/१२, संत दगा महाराज कॉम्प्लेक्स, कोरीट नाका, नंदुरबार. **जळगाव कार्यालय** - बी विंग, रुम नं. ११ तिसरा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव. E-mail: lakshamaha.dhule@gmail.com. (RNI No.MAHMAR/2019/79184)

# गरजूंसाठी गुलाबी थंडीत धावले पाच हजारांहून अधिक नाशिककर





**नाशिक । प्रतिनिधी**

काल शनिवार दि. १३ रोजी समाजातील गरजूंसाठी गुलाबी थंडीत हजारो नाशिककर धावले व नाशिक रनच्या सामाजिक उपक्रमास हातभार लावला. या उपक्रमास संस्थापक विश्वस्त सर्वश्री सौमित्र भट्टाचार्य, चेअरमन रश्मीरंजन भूयान, व्हाइस चेअरमन अशोक पाटील, सचिव अनिल दैठणकर, खजिनदार राजाराम कासार, विश्वस्त रमेश शालींग्राम, मुकुंद भट, प्रबल रे, अविनाश देशपांडे, श्रीकांत चव्हाण, माजी विश्वस्त उत्तम राठोड, बी.आर. थोन्टेश, सुरेश बी.आर, सुधीर येवलेकर तसेच बॉश व टीडीके कंपनीचे वरिष्ठ अधिकारी प्रभू पांडुरंगा, क्रिस्तोफर वोइसनेर, वेंकटेश राघवन, अरविंद नेगी, रमेश जी.आर, आणि नाशिक रन करता मोलाचे सहकार्य करणारे सुमित बजाज, आशिष सहा, जॉय अलूर, शशांक बठारिया, दयानंद कुलकर्णी आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.

ह्या उपक्रमात जवळजवळ ५००० हुन अधिक नागरिकांनी सहभाग नोंदवला. सकाळी ७.३० ते ७.५५ या कालावधीत प्रमुख पाहुण्यांचे आगमन झाले. सकाळी ८ ते ८.१० या कालावधीत रनचे उद्घाटन व राष्ट्रगीत संपन्न झाले. ८.१० वाजता नाशिक रन च्या उद्घाटनाची औपचारिक घोषणा करण्यात आली, विजय काकड यांचे हस्ते नाशिक रनची ज्योत प्रज्वलित करण्यात आली ८.१५ ते ८.२० कालावधीत वॉर्म अप, ८.३० ते ८.४० या कालावधीत विशेष मुलांसाठी रन चा शुभारंभ झाला. ८.४० ते ८.५५ या कालावधीत लहान मुलांसाठी रनचा शुभारंभ झाला. ८.५५ वाजता प्रौढांसाठी रनची सुरुवात झाली. ९.३० ते ९.३५ या कालावधीत नृत्य सादरीकरण करण्यात आले. ९.३५ ते ९.५५ या कालावधीत रन मध्ये सहभाग घेतलेल्या उपस्थितांसाठी लकी ड्रॉ काढण्यात आला.

अनिल दैठणकर यांनी उपस्थित मान्यवर, रन साठी भरभरून प्रतिसाद देणाऱ्या नाशिककरांचे व रन साठी प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष सहभाग असणाऱ्या संस्थांचे, पत्रकार बांधवांचे रन साठी विशेष परिश्रम घेतलेल्या १५० हून अधिक स्वयंसेवकांचे आभार मानले . १० ३० वाजता नाशिक रन समारोप करण्यात आला. दरम्यान रन च्या मध्यंतर काळात उप प्रादेशिक परिवहन अधिकारी विनोद वसईकर यांनी रन फॉर सोशल कॉज बरोबरच रन फॉर रोड सेफ्टी चा संदेश देऊन रोड सुरक्षिततेचे चार मूलभूत घटका द्वारे विषद केले.

नाशिक रन यशस्वीतेसाठी गेल्या पंधरा दिवसापासून कर्नल सागर काजळे यांच्या मार्गदर्शनाखाली श्रीपाद कुलकर्णी, राहुल कुलकर्णी, डॉ. विनिता जॉर्ज, अमोल शिंदे, घनश्याम वाबळे, सुधीर पाटील, विष्णू गाजरे, मयूर रौंदळ, सतीश कदम, अभिजीत कुलकर्णी, वैशाली पवार, पुनम देसाई, दिव्या पाटील, केदार मुजुमदार, गोविंद बोरसे यांचेसह व्यवस्थापनासाठी नितीन देशमुख, स्नेहा ओक या व्यवस्थापकीय पदाधिकारीसह समवेत १५० हून अधिक स्वयंसेवक नाशिक रनच्या यशस्वितेसाठी कार्यरत होते.

## ऊर्जावरण रक्षण, संवर्धनासाठी 'इशरे' संघटनेची जबाबदारी




**नाशिक । प्रतिनिधी**

वाढते शहरीकरण, जंगलतोड, भौतिक प्रगती आणि अती आरामदायी जीवनशैली पर्यावरणाला घातक ऊर्जेचा खूप मोठ्या प्रमाणावर गैरवापर केला जातो. तो टाळला पाहिजे. अशावेळी 'इशरे' च्या सदस्यांची जबाबदारी वाढते. वसुंधरा सर्वांची असून तिची काळजी घेणे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. पुढील पिढ्यांना चांगले जीवन द्यायचे असेल तर चुकीच्या पारंपरीक सवयी बदलल्या पाहिजेत असा सूर ऊर्जावरण परिषदेत उमटला.

इंडियन सोसायटी ऑफ हिटिंग, रेफ्रिजरेशन अँड एअर कंडिशनिंग इंजिनिअर्सची 'इशरे' ही देशव्यापी संघटना आहे. या संघटनेच्या नाशिक चॅप्टरतर्फे काल शनिवारी ( दि. १३) जानेवारी रोजी 'ऊर्जावरण २०२३ -२४' या परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. हॉटेल ग्रँड रिओ येथे झालेल्या या परिषदेचा प्रमुख विषय शाश्वत विकास, नावीन्य व सक्रिय सहभाग असा होता. अध्यक्ष गोविंद नायर यांनी स्वागत केले व परिषदेचा उद्देश सांगितला. मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. या परिषदेला प्रमुख पाहुणे म्हणून ग्रीन स्पेसेसचे संचालक किरण चव्हाण उपस्थित होते. प्रमुख वक्ते ले एनेर्जीका इएस संस्थेचे विश्वास नवरे, वास्तुविशारद अजय सोनार, ईलेक्ट्रो- मेक कन्सल्टंट्सचे रुपेश उमटाले, पुण्यातील इको सोल्यूशन्सच्या डॉ. अंशुल गुजराथी आदी मान्यवर होते.

विश्वास नवरे यांनी छोट्याशा बाबीत घेतलेल्या दक्षतेने मोठी ऊर्जाबचत कशी करता येते हे समजावून दिले. किरण चव्हाण यांनी ग्रेप काउंटी प्रकल्पात निसर्गाचे निसर्गालाच अर्पण करण्याचे तत्व पाळून ऊर्जेचा योग्य वापर केल्याचे सांगितले. सर्व वक्त्यांनी जागतिक स्तरावरील अवघड व तांत्रिक विषय स्लाईड शोद्वारा अतिशय सोपा करून सांगितला. समीर वझे व तांत्रिक सल्लागार सुरेश दिडमिशे यांनी सूत्रसंचालन केले. सचिव वरुण तिवारी यांनी आभार मानले. कार्यक्रमाला संघटनेचे सर्व सदस्य तसेच जिज्ञासू उपस्थित होते. सर्व उपस्थितांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतील भारतासाठी ऊर्जा रक्षण, संवर्धनाची शपथ घेतली. उपक्रम प्रमुख प्रवीण पातूरकर, माजी अध्यक्ष मधुसुदन गायधनी, आगामी अध्यक्ष अश्फाक कागदी, खजिनदार शामसुंदर कापसे, समन्वयक डॉ.अनिता बोराडे व सहकाऱ्यांनी उपक्रमाच्या यशस्वितेसाठी परिश्रम घेतले.

## डॉ. अडचित्रे यांची सहयोगी प्राध्यापक म्हणून पदोन्नती

**नाशिक । प्रतिनिधी**

येथील श्री भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील सूक्ष्मजीवशास्त्र विभागातील डॉ. एच. आर. अडचित्रे ह्यांचा शासनाने पदोन्नती दिल्याने मोठ्या उत्साहात निरोप समारंभ कार्यक्रम झाला. सुक्ष्मजीवशास्त्र विभागाच्या डॉ. माधुरी कलाल, डॉ. सुजीत तिवारी, डॉ.राहुल वाडिले, डॉ. पुर्वा पाटील, डॉ. ओरीसा समीता, वरीष्ठ प्रयोग शाळा तंत्रज्ञ किशोर पाटील, सुहासिनी गावित, समुपदेशक बी. एम. पाटील, योगेश



सोनवणे, तुषार महाजन, संदीप कंडारे यांच्यासह वृंद व विविध विद्यशाखेचे विद्यार्थी उपस्थित होते. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय जळगाव येथे सहयोगी प्राध्यापक म्हणून पदोन्नतीनंतर नियुक्ती झाली. त्यानिमित्त येथील हिरे वैद्यकीय महाविद्यालयात डॉ. अडचित्रे यांचा सत्कार झाला.

## अक्षय उर्जा फाउंडेशनच्या कार्यक्रमात नाशिककरांचा उत्स्फूर्त सहभाग

**नाशिक । प्रतिनिधी**

पवित्र गोदावरीच्या तीरावर लखलखत्या दिव्यांचा प्रकाश.. गंगा आरतीतून व्यक्त केलेली कृतज्ञता आणि आतषबाजीतून केलेला जल्लोष. असे उत्साहवर्धक वातावरण गुरुवारी गोदाकाठ परीसरात बघायला मिळाले. अयोध्या नगरीतील बहुप्रतिक्षीत राम मंदिरात २२ जानेवारी रोजी प्रभु रामचंद्र यांच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा केली जाणार आहे. यानिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आवाहनाला प्रतिसाद देतांना अक्षय ऊर्जा फाउंडेशनतर्फे आयोजित या कार्यक्रमात नाशिककरांचा उत्स्फूर्त सहभाग राहिला.



**अयोध्येतील श्रीराम मंदिरात प्रभूरामचंद्र यांच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा सोहळा ही ऐतिहासिक घटना आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आवाहनाला प्रतिसाद देतांना गोदाकाठी नाशिककर भाविकांचा चांगला प्रतिसाद मिळाला. अमावस्येपासून दिवाळीच्या सणाला सुरुवात होते. त्याप्रमाणे या अनोख्या दिवाळीला आजपासून सुरुवात केली असून, सर्वांनी एकत्रित येऊन आनंदोत्सव साजरा केला. हा उत्सव पुढील २२ जानेवारीपर्यंत असाच सुरु राहिल, अशी खात्री आहे.**
**-अनिल जाधव,**
**अध्यक्ष, अक्षय ऊर्जा फाऊंडेशन.**

अक्षय ऊर्जा फाऊंडेशनचे अध्यक्ष अनिल जाधव यांच्या नेतृत्त्वाखाली हे सर्व कार्यक्रम पार पडले. या कार्यक्रमाप्रसंगी मोठ्या प्रमाणावर मान्यवरांची उपस्थिती लाभली. नेहमीच भाविकांची वर्दळ असलेल्या गोदाकाठी परीसरात गुरुवारची सायंकाळ अविस्मरणीय स्वरुपाची राहिली. सायंकाळी ६ वाजेनंतर अक्षय ऊर्जा फाउंडेशनच्या वतीने आयोजित कार्यक्रमात एकत्रित येत नाशिककरांनी सहस्त्रदिप सोहळ्यात सहभाग नोंदविला. शेकडो दिप प्रज्वलित करतांना गोदाकाठ परीसर रोषणाईने उजळून निघाला होता. १० ते १५ हजार दिवे प्रज्वलित करण्यात आले होते. भजन कीर्तन, श्रीरामाचा जयघोष यावेळी करण्यात आला.

सहस्त्रदिप सोहळ्यानंतर विधिवत पद्धतीने गंगाआरतीचे आयोजन केले होते. यावेळी गोदावरीची आरती करतांना गोदामाईविषयी कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. तसेच अयोध्या नगरीत साकारल्या जाणाऱ्या राम मंदिराचा आनंदोत्सव साजरा करतांना यावेळी केलेली आतषबाजी लक्षवेधी ठरली. उपस्थित भाविकांना प्रसादाचे वाटप करण्यात आला.

याप्रसंगी अक्षय ऊर्जा फाऊंडेशनचे अध्यक्ष व भाजपचे ज्येष्ठ नेते अनिल जाधव यांच्यासमवेत फाऊंडेशनचे बापूसाहेब शिंदे, आबासाहेब टर्फले, ड.प्रतीक कर्डक, चंद्रशेखर जोशी, धीरेंद्र वाघ, नरेंद्र जाधव, सागर विंचू, राहुल निकम, सागर काकडे, दिनेश जाधव, भरत साळवे, सचिन खोडे, दीपक मंडलिक, भूषण अहिरे, अक्षय आहेर, शरद मंडलिक व इतर कार्यकर्त्यांनी परीश्रम घेतले.

## सावतानगरहून शिर्डीसाठी पायी दिंडीचे प्रस्थान

### बडगुजर दांपत्यातर्फे विधिवत पूजेसह महाआरती

**नाशिक । प्रतिनिधी**

सालाबादप्रमाणे यावर्षीही सावतानगर (सिडको) येथून श्री क्षेत्र शिर्डीसाठी पायी दिंडीचे प्रस्थान झाले. ज्येष्ठ माजी नगरसेविका हर्षा बडगुजर यांच्यासह सुमारे २५० साईभक्त दिंडीत सहभागी झाले आहेत. साईनाथ महाराज की जयच्या घोषणांनी यावेळी आसमंत परिसर दणाणला होता.



प्रारंभी सावतानगर येथे शिवसेना महानगरप्रमुख सुधाकर बडगुजर यांच्या संपर्क कार्यालयात त्यांच्या तसेच हर्षा बडगुजर यांच्या हस्ते पूजा व साईबाबांची आरती झाली. नंतर साईबाबांच्या जयघोषात आणि मंगलमय वातावरणात दिंडीचे शिर्डीकडे प्रस्थान झाले. हर्षा बडगुजर या दिंडीबरोबर शेवटपर्यंत कायम राहणार आहेत. तीन दिवसांत ही दिंडी शिर्डीला पोहोचेल. वाटेत सिन्नर आणि वावी येथे दिंडी मुक्कामी असेल. दिंडीचे हे अकरावे वर्ष आहे. दिंडीत सहभागी असलेले सर्व साईभक्त वाहतूक नियमांचे काटेकोर पालन करतील. असा विश्वास सुधाकर बडगुजर यांनी दिंडीच्या प्रस्थानाच्यावेळी व्यक्त केला.

यावेळी गोपी गिलबिले, प्रकाश खिंवसरा, सुरेश होळकर, डॉ.महेश निकम, विलास वाघ, बाबाजी अहिरे, नानासाहेब निकम, अनिल कर्नावट, विजय जाधव, अरुण गवते, गोपीनाथ सोनवणे, श्याम जन्नावर, अनिल ढोमणे, प्रकाश कदम व महिला भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. श्री साई युवक मित्र मंडळाचे पंकज जाधव, नितीन परदेशी, पंकज तिडके, सागर सोनार, साहिल थोरात, संदीप अहिरे, समाधान घोलप यांनी आयोजन केले होते.

## स्वामी विवेकानंद-राजमाता जिजाऊ यांना अभिवादन

**धुळे ।** येथील जिल्हा रूग्णालयातील परिचर्या प्रशिक्षण महाविद्यालयात स्वामी विवेकानंद आणि राजमाता जिजाऊ यांचे प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. रवी सोनवणे अध्यक्षस्थानी होते. जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.दत्ता देवगांवकर, अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.महेश भडांगे यांनी मार्गदर्शन केले. राष्ट्रीय युवा दिनानिमित्त विद्यार्थीनींसाठी निबंध स्पर्धा घेण्यात आली. सहाय्यक अधिसेविका वंदना मोरे, प्राचार्य मयुर गिते, पाठ्यनिर्देशक भूषण जोशी, श्रीमती अनिता बनाते, भक्ती महाजन आदी उपस्थित होते.

## अभिनव बालविकास मंदिर उत्तमनगर शाळेत राजमाता जिजाऊ, स्वामी विवेकानंद जयंती साजरी

**नाशिक । प्रतिनिधी**

म.वि प्र समाज संचलित अभिनव बालविकास मंदिर, उत्तमनगर, सिडको शाळेत राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती साजरी करण्यात आली.

सर्वप्रथम मुख्याध्यापिका ज्योती पवार यांच्या हस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले. तसेच शाळेतील उपशिक्षिका तनुजा देवरे यांनी राजमाता जिजाऊ तर उपशिक्षिका रोहिणी गायकवाड यांनी स्वामी विवेकानंद यांच्या जीवन कार्याविषयी विद्यार्थ्यांना थोडक्यात माहिती सांगितली. तर इयत्ता २ री ची विद्यार्थिनी आरोही माळी हिने स्वामी



विवेकानंद यांच्या जीवनकार्याची थोडक्यात माहिती सांगितली. आराध्या ठाणेकर, ३ री ची नव्या खराळे तर समर्थ वाणी यांनी राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या जीवन कार्याविषयी माहिती सांगितली. तसेच ईश्वरी बारवकर, अंजली पिंपरकर यांनी ओवी सादर केली. यावेळी मुख्याध्यापिका यांनी त्यांच्या मनोगतातून विद्यार्थ्यांना राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या जीवनाविषयी थोडक्यात माहिती सांगितली. यानिमित्ताने शाळेतील काही विद्यार्थी हे स्वामी विवेकानंद तर काही विद्यार्थिनी राजमाता जिजाऊ यांची वेशभूषा करून आले होते. कार्यक्रमासाठी विलास जाधव, सारेखा चौधरी, गायत्री काकडे, शितल सोळुंके, रणजित वाघचौरे व सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## अंतर्मुख करणारं हृदयस्पर्शी प्रायोगिक नाटक खुर्च्या



### आज सायंकाळी पाच वाजता रोटरीच्या सभागृहात प्रयोग

**नाशिक । दिलीप साळुंके**

येथील डॉ. आंबेडकर वाङ्मयीन अभ्यासमंडळ आयोजित आणि सोहम साधना मुंबई निर्मित निर्जन बेटावरील आभासी जिवनाचे प्रतिबिंब असलेले प्रायोगिक नाटक खुर्च्या चा दीर्घांक रोटरी सभागृह, गंजमाळ येथे रविवार दि.१४ जानेवारी रोजी सायंकाळी पाच वाजता होत असून रसिकांनी लाभ घ्यावा असे आवाहन अभिनेते राजन काजरोळकर यांनी केले आहे.

फ्रेंच नाटककार युजिन आयोनेस्कोंच्या 'चेअर्स' चं वृंदावन दंडवते यांनी मराठीत रुपांतर केलेल्या 'खुर्च्या'या प्रायोगिक नाटकाची कथा तशी साधी असली तरी अंतर्मुख करणारी आहे. सध्याचा भेडसावणारा ज्वलंत प्रश्न म्हणजे घराघरात आढळणारं जेष्ठांचं एकाकीपण. एक वयोवृद्ध जोडपं निर्जन बेटावर एकाकी आयुष्य जगत असतात. जवळपास कोणीही नाही. सर्वत्र फक्त पाणिच पाणी. सुख-दुःख सांगावं असं कोणीही जवळ नाही. मग ते एक आभासी जग निर्माण करतात आणि त्यात रममाण होण्याचा प्रयत्न करतात. पण नाटक शेवटाकडे जाताना काळजाला भिडते आणि रसिकांना अंतर्मुख करते. 'खुर्च्या'या दीर्घांकाचे मुंबई, ठाणे, पुणे येथे आतापर्यंत १५ प्रयोग झाले. या नाटकात अभिनेता राजन काजरोळकर आणि अभिनेत्री कविता मोरवणकर यांचा सहज सुंदर अभिनय मनाला स्पर्शून जातो. त्यांच्या कसदार अभिनयाने नाटक समृद्ध होत जाते. दोघं कलावंत दीड तास रंगमंचावर जे नाट्य उभ करतात त्यावेळी त्यांची देहबोली आणि मुद्राभिनय यातून हा विषय थेट रसिकांच्या हृदयापर्यंत भिडवण्यात ते कमालिचे यशस्वी होताना दिसतात. आभासी जगतातील त्यांचं रंगमंचावरील वावरणं लाजवाब. दोघांनी आपली पात्र अक्षरशः जगली आहेत. क्षितिज भंडारी यांची छोटीशी भूमिका ही लक्षात राहण्याएवढी समर्थपणे त्यांनी साकारली आहे. नाटक तसं समजायला कठीण असूनही सलग ९० मिनिटे दोन्ही कलाकार आपल्या समृद्ध अभिनयाने प्रेक्षकांना खुर्चीला खेळवून ठेवण्यात यशस्वी झालेले आहेत.

आभासी आणि वास्तवतेबरोबरच नाटकाचा गर्भीत आशय पोहोचवण्यात दिग्दर्शक महेंद्र डोंगरे कमालिचे यशस्वी झाले आहेत. त्यांचे धाडस कौतुकास्पद आहे.

या नाटकासाठीचे नेपथ्य प्रसिद्ध नेपथ्यकार विवेक जाधव यांचे असून प्रकाश योजना ऋषिकेश वायदंडे, पार्श्वसंगीत क्षितिज भंडारी, वेशभूषा मतिशा जाधव आणि रंगभूषा सुनिल जोशी यांनी केली आहे. नाट्य प्रयोगासाठी नाममात्र स्वागत मुल्य रु. १०० मात्र ठेवण्यात आले आहे. नाशिक येथे प्रथमच प्रायोगिक नाटक खुर्च्या चा प्रयोग होतो आहे.

## 'अहिराणी शब्दकोश' चे आज प्रकाशन

**नासिक । प्रतिनिधी**

ज्येष्ठ समीक्षक व अहिराणी भाषेचे अभ्यासक डॉ. बाळासाहेब गुंजाळ यांच्या अहिराणी शब्दकोशचे प्रकाशन आज रविवार दि. १४ जानेवारी रोजी सायंकाळी साडेपाच वाजता ग्रंथ भूषण मु. श. औरंगाबादकर सभागृह, सार्वजनिक वाचनालय नाशिक येथे होणार आहे.

या प्रकाशन सोहळ्यासाठी मराठा विद्या प्रसारक समाजाचे सरचिटणीस ड. नितीन ठाकरे, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे, प्राचार्य पंडितराव पवार, प्राचार्य प्रशांत पाटील या मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन सोहळा संपन्न होत आहे. पुणे येथील वैशाली प्रकाशन यांनी हा ग्रंथ प्रकाशित केला आहे. डॉ. बाळासाहेब गुंजाळ यांची 'अहिराणी म्हणी अनुभवाच्या खाणी' (भाग १ ते ४) या ग्रंथांसह २१ हून अधिक पुस्तके प्रकाशित झालेले आहेत. या प्रकाशन सोहळ्यास नाशिकसह जिल्ह्यातील साहित्यिक, रसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन डॉ.बाळासाहेब गुंजाळ, प्रकाशक विलास पोतदार तसेच इंडीयन मेडीकल असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. विशाल गुंजाळ यांनी केले आहे.

न्यूज कॉलम

## पतसंस्था महासंघाच्या सचिवपदी रवींद्र वाणी

**धुळे ।** जिल्हा पतसंस्था महासंघ (फेडरेशन) संस्थेच्या सचिवपदी रवींद्र वाणी तर कार्यकारी संचालकपदी बी. टी. देवरे यांची निवड झाली. फेडरेशनच्या कार्यालयात नवनिर्वाचित संचालकांची सभा झाली. तीत ही निवड करण्यात आली. अध्यक्ष लक्ष्मीकांत शाह अध्यक्षस्थानी होते. वि. शा. जैन ग्रामीण सहकारी पतपेढी, कापडणे (ता. धुळे) संस्थापक व चेअरमन रवींद्र वाणी यांची सचिवपदी, कार्यकारी संचालकपदी आर. पी. पाटील पतपेढीचे (धुळे) संचालक बी. टी. देवरे यांची निवड झाली. फेडरेशनचे माजी अध्यक्ष गोपाळराव केले, उपाध्यक्ष देवीदास पाटील, संचालक डॉ. दरबारसिंह गिरासे, डॉ. भास्कर एस. पाटील, योगीता शहा, बी. टी. देवरे, सुरेश जैन, कैलास गोगड, जगदीश सूर्यवंशी, धर्मेंद्र जैन, उदय शिनकर, डॉ. उषा साळुंखे, वृषाली चिंचोले उपस्थित होते. जिल्हा पतसंस्था महासंघ (फेडरेशन) संस्थेच्या नवर्निवाचित संचालक मंडळाच्या पहिल्या सभेत निवडीची प्रक्रिया पार पडली. गटनेते गोपाळराव केले यांच्या हस्ते सचिव व कार्यकारी संचालक यांचा सत्कार झाला.

# वरुळ प्राथमिक आरोग्य केंद्राची मुख्यकार्यकारी अधिकारी शुभम गुप्ता यांनी केली पाहणी

**वरुळ । लक्ष महाराष्ट्र वृत्त**





वरूळ ता.शिरपूर येथील प्राथमिक आरोग्य केंद्राला मुख्यकार्यकारी अधिकारी शुभम गुप्त यांनी अचानक भेट दिली.भेटी दरम्यान आरोग्य केंद्रातील सुविधा,ओ पीडी कक्ष,प्रसूती कक्ष,साचते संदर्भातील पाहणी करत आरोग्य केद्राकडे येणाऱ्या रस्ता व संरक्षा भिंत बांधणे बाबत मार्गदर्शन केले.आवारातील व आरोग्य केंद्रातील अस्वच्छतेच्या बाबतीत नाराजी दर्शवित ग्रामसेवक प्रीतम पवार यांची कान उघडणी केली.

वरूळ येथील आरोग्य केंद्र सुरु होऊन वर्षे होत आले.या आरोग्य केंद्रात दोनच कर्मचारी आहेत.कर्मचाऱ्यांच्या अभावामुळे परिसरातील रुग्णाची गैरसोय होत आहे.सुसज्ज इमारत परंतु कर्माचा अभाव असल्याने आरोग्य केंद्र परिसरात काटेरी झुडूप तयार झाले आहेत.तर आतील भागातील साहित्यावर धूळ जमा झाली आहे अशा परिस्थितीत मुख्यकार्यकारी अधिकारी गुप्ता यांनी भेट दिली अस्वच्छतेच्या बाबतीत नाराजी व्यक्त करत स्वच्छतेची ग्रामपंचायतीची जबाबदारी असून आपल्यावर कार्यवाही का करू नये असे ग्रामसेवक प्रीतम पवार याना विचारणा केली. सरपंच नरेंद्र मराठे यांनी आरोग्य केंद्रावर पुरेसा कर्मचारी नसल्याने रुग्णांची गैरसोय होत आहे. सर्व सुविधा उपलब्ध असून देखील कर्मचारी नसल्याने उपचार होऊ शकत नाही असे सांगितले.मागील बाजूस संरक्षण भिंत व मुख्य रस्त्या पर्यंत कॉंक्रिट रस्त्याची सुविधा करणे बाबत सरपंच मराठे यांनी मागणी केली असता.आरोग्य केंद्रावर येणार्या रस्त्यासाठी जन सुविधेतून मागणी करा व मागील संरक्षण भिंत १५ व वित्त आयोगातून सुविधा करावी अशी सूचना श्री.गुप्ता यांनी केली.ग्रामपंचायती तर्फे श्री.गुप्ता यांना शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.या प्रसंगी कार्यकारी अभियंता मुकेश ठाकूर,पाणी पुरवठा कार्यकारी अभियंता जयश्री साळवे,सहाय्यक गट विकास अधिकारी सुवर्णा पवार,विस्तार अधिकारी आर जे पावरा,तालुका आरोग्य अधिकारी डॉ. प्रसन्नकुमार जैन,वैद्यकीय अधिकारी दीपिका मोरे ,आरोग्य सेवक प्रकाश वाघ व अधिकारी हजर होते.

ओपीटी बाबतीत व्यक्त केले समाधान

दोन कर्मचारी असून देखील रोज पंचवीस ते तीस रुग्ण भेटी देत असल्याचे ओपीटी वरून येत असल्याने श्री गुप्ता यांनी समाधान व्यक्त केले.

येथील आरोग्य केंद्रात औषध निर्माण अधिकारी-१,प्रयोग शाळा वैचारिक -१,आरोग्य सहाय्यक-१,आरोग्य सहाय्यिका-१,आरोग्य सेविका -१,परिचालक -४ असे एकूण चौदा पडे रिक्त,

रस्ता कॉंक्रेट व संरक्षण भितीकारिता अनुदान देण्याची सरपंच यांची मागणी

२५/१५ योजांतून संरक्षण भिंत व जन सुविधेतून मुक्या रस्त्यापासून आरोग्य केंद्र पर्यंत कॉंक्रेट रस्ता मिळावा तसेच नवीन कर्मचारी नेमणूक होत नाही तो पर्यंत इतर आरोग्य केंद्रातील कर्मचारी वर्ग करावे अशी मागणी सरपंच नरेंद्र मराठे यांनी केली.



# राष्ट्रीय स्पर्धेसाठी मोहाडीतील पाच खेळाडूंची राज्याच्या नेटबॉल संघात निवड

### सोनिया गावडेकडे कर्णधारपद

**धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

मेहबूबनगर ( तेलंगणा ) येथे दि.१३ जानेवारी सुरु झालेल्या दुसरी सिनियर पुरुष व महिला राष्ट्रीय फास्ट फाईव्ह नेटबॉल क्रीडा स्पर्धेकरीता धुळे जिल्ह्यातील दोन पुरुष व तीन महिला खेळाडूंची भंडारा येथील दसरा मैदानात झालेल्या निवड चाचणी व राष्ट्रीय स्पर्धापुर्व प्रशिक्षण शिबीरातून निवड समिती सदस्यांनी या पाचही खेळाडूंची राज्याच्या संघात निवड केली आहे. त्यात शहरातील झेड बी पाटील महाविद्यालयातील सोनिया रविंद्र गावडे हिला मुलींच्या संघाचे कर्णधारपद सोपविण्यात आले आहे. तर आदित्य संतोष दहातोंडे, चेतन विठ्ठल पाटील, व एसएसव्हीपीएस महाविद्यालयाची ऋतुजा अनिल आव्हाड आणि मोहाडी उपनगरातील श्री. पिंपळादेवी विद्यालयाची गितांजली दिपक खैरनार यांचा संघात समावेश आहे. सदर राष्ट्रीय स्पर्धेतून पहिल्या आठ क्रमांकाने विजेतेपद मिळविणारे संघ (उत्तराखंड ) येथे होणाऱ्या ३८ वी नॅशनल गेम्स् स्पर्धेसाठी पात्र ठरतील. निवड झालेल्या खेळाडूंना ऋत्विक ठाकुर यांनी प्रशिक्षण दिले. मा.नगरसेवक विनायक शिंदे, राज्य असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. बिपीनभाई कामदार, सचिव डॉ. प्रा.ललित जिवाणी, सहसचिव शाम देशमुख,जिल्हा मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष आर व्ही पाटील, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष कुणाल पवार, धुळे जिल्हा न्यू हौशी सेपक टॉंकरा असोसिएशनचे अध्यक्ष आकाश शिंदे, उपाध्यक्ष अविनाश वाघ, जिल्हा हौशी नेटबॉलचे सचिव योगेश वाघ, हौशी शूटींगबॉलचे सचिव महेंद्र गावडे, वैशाली वाघ, शितल वाघ यांनी अभिनंदन केले व शुभेच्छा दिल्या.

# विसपूते विद्यालयात स्वामी विवेकानंद व राजमाता जिजाऊ जयंतीनिमित्त वक्तृत्व स्पर्धा संपन्न

**धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त**



शालेय विद्यार्थ्यांना शालेय जीवनात थोर पुरुषांचे विचार प्रेरणादायी ठरतात. त्यांना जीवन जगण्याची प्रेरणा मिळते. याच उद्देशाने आज दिनांक १२ जानेवारी रोजी बापूसाहेब डी. डी. विसपूते माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, वलवाडी ता. जि. धुळे येथे स्वामी विवेकानंद व राजमाता जिजाऊ यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी प्राचार्य श्री पी. बी. पाटील अध्यक्षस्थानी होते. व्यासपीठावर श्री एस. आर. पाटील, श्री डी. डी. पवार, श्री एस. बी. भदाणे उपस्थित होते. मान्यवरांच्या शुभहस्ते प्रतिमापूजन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री डी. डी. पवार यांनी केले. सुत्रसंचालन राजमाता जिजाऊंची वेशभूषा साकारलेली कु. भाविका मोहीते व कु. अंकिता मोरे यांनी केले. श्री ए. के. पाटील यांनी मनोगत व्यक्त केले.

यानिमित्त शालेय विद्यार्थ्यांसाठी वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. हि स्पर्धा दोन गटात घेण्यात आली. इ. ५ वी ते इ. ७ वी या गटातून प्रथम ओम पवार, द्वितीय पुनम गवळी, तृतीय रोशन बळसाणे आणि इ. ८ वी ते इ. १० वी या गटात प्रथम क्रमांक कु. भाविका मोहीते, द्वितीय आर्यन वेंदे, तृतीय भारत जाधव यांनी पटकावला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विजय देसले, श्रीमती अपर्णा पाटील, महेंद्र बाविस्कर, योगेंद्र पाटील, महेश पाटील, राजश्री मासूळे, जयेश गाळणकर, कुणाल साळूंखे, तुषार कुलकर्णी, अभिज्ञ पवार, महेश पवार, व विलास भामरे यांनी मेहनत घेतली.

# एच. आर. पटेल कन्या माध्यमिक विद्यालयात महावाचन महोत्सव साजरा

**शिरपूर । लक्ष महाराष्ट्र वृत्त**



शहरातील एच. आर. पटेल कन्या माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात महावाचन महोत्सव साजरा करण्यात आला.

प्राचार्य आर.एन.पवार, पर्यवेक्षक जे.पी.पाटील उपस्थित होते. प्राचार्य आर.एन.पवार यांनी महावाचन महोत्सवाचे महत्त्व याविषयी मार्गदर्शन केले. तसेच व्ही. सी. महाजन यांनी मनोगत केले. महावाचन महोत्सवात इयत्ता ५ वी ते इ. १० वी च्या सर्व विद्यार्थिनींनी वाचनीय पुस्तकांचे वाचन केले.

# नेहरु युवा केंद्रातर्फे राष्ट्रीय युवा सप्ताहनिमित्त गीतगायन स्पर्धा संपन्न



**धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

भारत सरकारच्या खेळ व युवा कार्यक्रम मंत्रालय अंतर्गत कार्यरत असलेल्या नेहरु युवा केंद्र धुळे तर्फे स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय युवा सप्ताहात शनिवार दि. १३ जानेवारी रोजी सांस्कृतिक दिवस साजरा करण्यात आला. यानिमित्त पत्रकार भवन येथे प्रबोधनपर गीतगायन स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत महेंद्र शिंदे, शरद वेंदे, सिध्दांत बागुल यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाची पारितोषिके पटकावली. विजेत्यांना धुळे जिल्हा मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष मनोज गर्दे, उपाध्यक्ष अतुल पाटील, माजी अध्यक्ष चंद्रशेखर पाटील यांच्या हस्ते स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्रे देवून गौरविण्यात आले. स्पर्धेचे परीक्षण नेहरु युवा केंद्राच्या माजी राष्ट्रीय युवा स्वयंसेवक सौ. उमा बागुल, प्रगती ऑनलाईन सर्व्हिस सेंटरचे संचालक अमोल शिरसाठ यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन सचिन बागुल यांनी केले.

# एसआरआर विद्यालयात राजमाता जिजाऊ व विवेकानंद जयंती साजरी

**होळनांथे । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

येथील साईबाबा संस्थान संचलित एस आर आर इंग्लिश मीडियम स्कूल मध्ये राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांची जयंती उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. यावेळी विद्यार्थीनींनी राजमाता जिजाऊ तर विद्यार्थ्यांनी स्वामी विवेकानंदांची वेशभूषा धारण केली होती. सदर कार्यक्रमाच्या सुरुवातीला राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले होते. विद्यालयाच्या संचालिका सौ. विजया राजपूत यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित सदर कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर केलेत.



# महाराष्ट्र दारूबंदी महिला युवा मोर्चाच्या दिनदर्शिकेचं पत्रकार भवनात झालं प्रकाशन

**धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

गेल्या ८ वर्षांपासून धुळे जिल्ह्यासह महाराष्ट्रात दारूबंदी व्हावी ही जनसामान्यांची चळवळ म्हणून कार्यरत असलेल्या महाराष्ट्र दारूबंदी महिला युवा मोर्चाच्या सन २०२४ च्या प्रथम दिनदर्शिकेचा प्रकाशन समारंभ पत्रकार भवनात दिनांक १३ जानेवारी रोजी पार पडला. पत्रकार संघाचे अध्यक्ष मनोज गर्दे, उपाध्यक्ष अतुल पाटील, माजी अध्यक्ष रवींद्र इंगळे,चंद्रशेखर पाटील, राकेश गाळाणकर, वीरांगना झलकारीबाई कोळी स्त्री शक्ती सामाजिक संस्था धुळे संचलित महाराष्ट्र दारूबंदी महिला युवा मोर्चाच्या अध्यक्षा गीतांजली कोळी यांच्या हस्ते दिनदर्शिकेचं प्रकाशन करण्यात आलं. यावेळी दारूबंदी मोर्चाची नूतन कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. याप्रसंगी विमल सोनवणे, मंगलबाई सोनवणे, सुनीता मगरे, त्रिवेणाबाई आढावे, विमलबाई जाधव योगेश सैंदाणे, प्रज्ञा ढवण, लखन कोळी, प्रल्हाद कोळी, योगेश कोळी, उपस्थित होते. दारूबंदी मोर्चाच्या सामाजिक कार्याला तळागाळातून मोठा प्रतिसाद असून सर्वांनी या सामाजिक कार्यात योगदान द्यावे असा आवाहन याप्रसंगी गीतांजली कोळी यांनी केलं.







॥ सस्नेह निमंत्रण ॥

धुळे जिल्हा मराठी पत्रकार संघ, धुळे

सर्वोत्कृष्ट पत्रकारांसह विविध क्षेत्रांतील रत्नांचा सन्मान आणि नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा पदग्रहण समारंभ

रविवार, दि. १४ जानेवारी २०२४ रोजी सायं. ६.०० वाजता

* कार्यक्रमाचे अध्यक्ष *

मा. खासदार बाबासो. डॉ. सुभाषजी भामरे (माजी केंद्रिय संरक्षण राज्यमंत्री, भारत सरकार)

* पुरस्कार शुभहस्ते प्रदान *

मा. श्री. दादाजी भुसे सो. (सार्वजनिक बांधकाममंत्री, महाराष्ट्र राज्य)
मा. श्री. भाईसो. अमरिशजी पटेल (आमदार/माजी मंत्री)
मा. श्री. बाबासो. कुणालजी पाटील (आमदार, धुळे ग्रामीण)
मा. श्री. भाऊसो. आ. जयकुमारजी रावल (माजी मंत्री)

* प्रमुख अतिथी *

मा.श्री.भैय्यासो. चंद्रकांतजी रघुवंशी (माजी आमदार) मा.ताईसो. मंजुळा गावित (आमदार, साक्री)
मा. श्री. श्रीकांतजी धिवरे (पोलिस अधीक्षक, धुळे) मा. श्री. फारुखजी शाह (आमदार, धुळे शहर )
मा. श्री. काशिरामजी पावरा (आमदार, शिरपूर) मा. श्री. अविष्कारजी भुसे (युवानेते)
मा. श्री.बाबासो.राजवर्धनजी कदमबांडे (अध्यक्ष: डीडीसी बँक, धुळे/ मा.आमदार)

* पुरस्कारार्थी *

मा. श्री. हेमराजजी बागूल संचालक (प्रशासन), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई
मा. श्री. नरेंद्र (बंडूनाना) कुलकर्णी (ओएसडी, ना. अब्दुलजी सत्तार सो. (खान्देशरत्न)
मा. श्री. विवेकजी भावसार (ज्येष्ठ पत्रकार/संस्थापक, 'द न्यूज २१')
मा. श्री. अनिलजी चव्हाण (संस्थापक संचालक, झेप मराठी न्यूज)
मा. श्री. चेतनजी मंडोरे (युवा उद्योजक, धुळे (उद्योगरत्न)
मा. श्री. राजेंद्रजी इंगळे (सामाजिक कार्यकर्ते, धुळे (समाजरत्न)

* विशेष सन्मानार्थी *

मा. श्री. अनुपभैय्या अग्रवाल मा. श्री. इर्शादभाई जहागीरदार
मा. श्री. ॲड. मधुकरजी भिसे मा. श्री. विजयजी टाटीया
मा. श्री. डॉ. सुशीलजी महाजन मा. श्री. संदीपतात्या महाले
मा. श्री. हिलाल अण्णा माळी

* पदग्रहणार्थी पदाधिकारी *

मनोज गर्दे (अध्यक्ष) अतुल पाटील (शहर उपाध्यक्ष) अरुण धोबी (ग्रामीण उपाध्यक्ष)
सचिन बागूल (सचिव) तुषार बाफना (कोशाध्यक्ष) प्रकाश शिरसाट (प्रांतिक प्रतिनिधी).

* सदस्य मंडळ *

रवींद्र नगराळे, मोहन मोरे, पुरुषोत्तम पाटील, मनोहर सोलंकी, राजेंद्र भावसार, राकेश गाळणकर, संतोष ताडे, रेखचंद जैन, दीपक शिंदे, आकाश सोनवणे, जमिल शाह,

* स्वीकृत सदस्य *

अशोक तोटे, पंकज पाटील, वाल्मीक पाटील, आवेश खान, प्रदीप राजपूत, अजिंक्य देवरे

आपले विनित

श्री. भालचंद्र पुंजू ठाकूर, श्री. देवीदास निंबा माळी, श्री. रवींद्र नामदेव इंगळे, श्री. मिलींद अवचित बैसाणे, श्री. चंद्रशेखर आत्माराम पाटील, श्री. ओमप्रकाश गुलाबचंद शर्मा, श्री.नुरखान नवाजखान पठाण श्री. सिध्दार्थ संतोष पारेराव, श्री.सुनील भगवान पाटील, श्री.विशाल ठाकूर,श्री.पुरुषोत्तम गरुड, श्री. गणेश भीमराव सावंत, श्री.सुभाष बारकू वाघ,

स्थळ : धुळे जिल्हा मराठी पत्रकार संघ, धुळे., आयकर भवनच्या मागे, साक्री रोड, धुळे.

# पटेल सीबीएसई निवासी स्कूल मध्ये 'सृजन' वार्षिक स्नेह संमेलन संपन्न

**शिरपूर । लक्ष महाराष्ट्र वृत्त**



श्री विलेपार्ले केळवणी मंडळ, मुंबई संचलित तांडे ता. शिरपूर येथील मुकेश आर. पटेल सीबीएसई निवासी स्कूल मध्ये वार्षिक स्नेह संमेलन 'सृजन' उत्साहात साजरे झाले.

'भारत की संस्कृती' या थीम अंतर्गत सादरीकरण करत विद्यार्थ्यांनी उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमाचे उद्घाटन प्रमुख पाहुणे धुळे जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन व सरस्वती पूजनाने झाले. कार्यक्रमाला एस. व्ही. के. एम. संस्थेचे सह-अध्यक्ष भूपेशभाई पटेल, मुकेश पटेल चॅरिटेबल ट्रस्ट डायरेक्टर कु. द्वेता भूपेशभाई पटेल, व्यवस्थापन समिती सदस्य राजगोपाल भंडारी, विजय अग्रवाल, योगेश भंडारी, यशवंत बाविस्कर, एसव्हीकेएम स्कूल डायरेक्टर श्रीमती गिरीजा मोहन, शेरिल मुखत, शाळेचे प्राचार्य डॉ. जॉन लॉरेन्स, अनेक मान्यवर उपस्थित होते.

यावेळी संस्थेतील विविध शाळांचे प्राचार्य, उपप्राचार्य, पालक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. विद्यार्थ्यांना उत्कृष्ट दर्जाच्या सर्वोत्तम सुविधा देत असल्याबद्दल जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांनी संस्थेचे कौतुक केले.

प्राचार्य डॉ. जॉन लॉरेन्स यांनी शाळेच्या वार्षिक अहवालाचे वाचन केले. शाळेच्या विद्यार्थ्यांनी वर्षभरात शैक्षणिक, क्रीडा, सामाजिक क्षेत्रांत केलेल्या कामगिरी व यश याबद्दल सविस्तर विवेचन केले. प्राचार्य डॉ. जॉन लॉरेन्स यांच्या मार्गदर्शनाखाली 'भारतीय संस्कृती' या थीम अंतर्गत विविध राज्यांचे नृत्य प्रकार सादर करण्यात आले. सर्व प्रथम विद्यार्थ्यांनी गणेश जन्मोत्सव ही नाटिका आणि नृत्य सादरीकरण केले. महाराष्ट्राचा गोंधळ, गुजरातची संस्कृती दाखवणारा गरबा, राजस्थानचा घुमर आणि कालबेलिया, पंजाबचा भांगडा, काश्मीरचा रौफ, आसामचा बिहू, गोव्याचे कार्निव्हल नृत्य प्रकार सादर करण्यात आले. थरारक दृश्यांसह स्केटिंग हा धाडसी प्रकार शाळेच्या रॉकिंग स्केटर्सनी सदर केला. 'कला सृष्टी' चित्र सादरीकरणात विद्यार्थ्यांनी महाराष्ट्राचे आद्य दैवत छत्रपती शिवाजी महाराजांचे चित्र काढले. सुरेल समूहगीत व तालबद्ध बँण्डचे सादरीकरण विद्यार्थ्यांनी केले. ग्रँड फिनेलेमध्ये भारतीय नृत्यांचे सादरीकरण करण्यात आले. इतिहासातील अजरामर महिला हे नाटक उपस्थितांची दाद मिळवून गेले. उपस्थित पालकांनी टाळ्यांचा कडकडाट करत विद्यार्थ्यांचा उत्साह वाढवला.